


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २६२ ■ बुधवार, दि. १ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# व्यावसायिक सिलिंडर 218 ने महागले !



**वृत्तसंस्था १ एप्रिल**

**नवी दिल्ली** :आज १ एप्रिल आहे. नवीन आर्थिक वर्षाची सुरुवात व्यावसायिक गॅस सिलिंडर महाग झाल्याने झाली आहे. सरकारी तेल कंपन्यांनी त्याचे दर २१८ रुपयांपर्यंत वाढवले आहेत.याशिवाय आता रेल्वे तिकीट ८ तास आधीपर्यंतच रद्द करता येणार आहे. आजपासून फास्टॅग, टोल टॅक्ससोबत आयकर संबंधित नियम मिळून एकूण १५ बदल होत आहेत. तेल कंपन्यांनी व्यावसायिक गॅस सिलिंडर २१८ पर्यंत महाग केला आहे. चेन्नईमध्ये तो सर्वात महाग २२४६.५० रुपयांना मिळेल. दिल्लीत त्याची किंमत २०७८.५० झाली आहे. व्यावसायिक सिलिंडरच्या किमती वाढल्याने रेस्टॉरंट मालकांचा खर्च वाढेल. अशा परिस्थितीत ते चहा, नाश्ता आणि थाळी महाग करू शकतात. लग्नांची कॅटरिंगही महाग होऊ शकते.

आजपासून नवं आर्थिक वर्ष सुरु होत असून अनेक नवे नियम लागू होत आहेत. रेल्वे, आयकर कायदा, पॅन, आधार, परदेश प्रवास अशा अनेक क्षेत्रात हे बदल होत आहेत. रेल्वे, आयकर कायदा, पॅन, आधार, परदेश प्रवास अशा अनेक क्षेत्रात हे बदल होत आहेत. आयकर कायद्यातील बदलांमुळे नोकरदारांसाठी होणारे बदल सुखावह आहेत. यानूसार नव्या सॅलरी स्लिपमध्ये बेसिक पे अर्थात मूळ वेतन हे वेतनाच्या ५० टक्के राहणार आहे. तर बेसिक पे वाढल्यानं ईपीएफ आणि ग्रॅच्युइटी वाढणार आहे.

यासह अनेक महत्त्वाचे बदल होणार आहेत. आजपासून मुंबईत विजेचा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांच्या दरातही कपात होणार आहे. आजपासून नवे दर लागू होणार आहेत. तर नवीन आर्थिक वर्षात रेडी रेकनरच्या दरात मात्र कोणतीच वाढ होणार नाही. आजपासून इंडिगो आणि एअर इंडियासह इतर कंपन्यांच्या तिकीट दरात वाढ होण्याची दाट शक्यता आहे.इन्कम टॅक्स रिटर्न सुधारण्यास ९ ऐवजी १२ महिन्यांची मुदत, मात्र ९ व्या महिन्यानंतर फी लागणार आहे. तर फक्त आधार कार्डद्वारे पॅन कार्ड मिळणे बंद, जन्म दाखला, मतदार ओळखपत्र, पासपोर्ट, वाहन परवाना, शालांत प्रमाणपत्र, मॅजिस्ट्रेट मंजुरीचे प्रतिज्ञापत्रही लागणार आहे. रस्ते अपघातात मिळालेल्या भरपाईवर इन्कम टॅक्स लागणार नाही.

## आजपासून काय काय बदलतंय ?

- कर्मचाऱ्यांसाठी खूशखबर, सर्व कंपन्यांतील कंपन्यांचं पगारपत्रक बदलणार
- नव्या सॅलरी स्लिपमध्ये बेसिक पे अर्थात मूळ वेतन हे वेतनाच्या ५० टक्के राहणार
- बेसिक पे वाढल्यानं ईपीएफ आणि ग्रॅच्युइटी वाढणार
- नोकरी संपताच ग्रॅच्युइटी वगळता सारे पैसे २ दिवसांत मिळणार, सध्या ३० ते ९० दिवसांची मुदत
- १९६१ चा इन्कम टॅक्स कायदा रद्द होऊन नवा इन्कम टॅक्स कायदा १९२६ लागू होणार
- एप्रिल ते मार्चचा कालावधीस 'टॅक्स इयर' असे नाव, सध्या 'असेसमेंट इयर'अशी ओळख
- परदेश दौरे,परदेशातील पाल्यास शिक्षण निधी, वैद्यकीय उपचारावर २ टक्केच टीसीएस

## नोकरदारांसाठी काय काय बदलणार ?

- बेसिक पे वाढल्यानं ईपीएफ आणि ग्रॅच्युइटी वाढणार
- नोकरी संपताच ग्रॅच्युइटी वगळता सारे पैसे २ दिवसांत मिळणार, सध्या ३० ते ९० दिवसांची मुदत
- १२ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांना इन्कम टॅक्स नाही
- कर्मचाऱ्यांना महिन्याला २५ हजार रु. किंवा भत्त्याच्या ७० टक्क्यांपर्यंत टीए देता येणार, सध्या १० हजार किंवा ७०टक्के मर्यादा
- इन्कम टॅक्स भरणाऱ्यांसाठी फॉर्म १६ आणि १६ ए ऐवजी फॉर्म १३० आणि १३१ लागू होणार
- इन्कम टॅक्स रिटर्न सुधारण्यास ९ ऐवजी १२ महिन्यांची मुदत, मात्र ९ व्या महिन्यानंतर फी लागणार



## रेल्वेच्या नियमात कोणते बदल?

- रेल्वेगाडी निघण्याच्या ८ तासांत तिकीट रद्द केल्यास परतावा नाही
- रेल्वे तिकीट गाडी निघण्याच्या ८-२४ तासांपूर्वी रद्द केल्यास ५०टक्के परतावा
- रेल्वे तिकीट गाडी निघण्याच्या २४-७२ तासांपूर्वी रद्द केल्यास २५ टक्के कपात
- गाडी निघण्याच्या ७२ तास आधी तिकीट रद्द केल्यास फक्त चार्जेस लागणार



# त्या वादग्रस्त अधिकाऱ्यांवर कारवाई केव्हा होणार !

## कृषी परिषदेकडून कारवाई करण्याचा आदेश



**प्रतिनिधी १ एप्रिल**

**अकोला:** महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्यात माहिती देण्यावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. अकोला विद्यापीठाच्या कुलसचिवांनी कृषी मंत्र्यांच्या आढावा बैठकीसाठी आवश्यक असलेली माहिती वेळेत न दिल्यामुळे आणि संबंधित अधिकाऱ्यांशी गैरवर्तन केल्यामुळे कृषी परिषदेने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे.

राज्याचे कृषी मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित आढावा बैठकीसाठी राज्यातील चारही कृषी विद्यापीठांकडून माहिती मागवण्यात आली होती. इतर सर्व विद्यापीठांनी माहिती सादर केली, मात्र अकोला कृषी विद्यापीठाकडून माहिती प्राप्त झाली नाही.या संदर्भात परिषदेने पाठपुरावा केला असता धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. तत्कालीन कुलसचिव डॉ.सतीश ठाकरे यांनी सुरुवातीला माहिती ई-मेलद्वारे पाठवल्याचे सांगितले, मात्र ती प्राप्त झाली नाही. त्यानंतर व्हॉट्स ॲपवर पाठवलेली माहिती देखील अपूर्ण होती. २ मार्च २०२६ रोजी झालेल्या एका चर्चेदरम्यान, कृषी मंत्र्यांच्या विशेष कार्य अधिकाऱ्यांनी माहितीबाबत विचारणा केली असता, डॉ.सतीश ठाकरे यांनी त्यांच्याशी उद्धटपणे आणि उलटसुलट भाषेत संवाद साधल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.या सर्व प्रकाराला कृषी परिषदेने अत्यंत गांभीर्याने घेतले आहे. 'सहसंचालक (प्रशासन)' रूपाली कोळी यांनी अकोला विद्यापीठाच्या विद्यमान कुलसचिवांना पत्र लिहून संबंधित अधिकाऱ्याला लेखी समज देण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, या प्रकरणावर काय कारवाई केली, याचा सविस्तर अहवाल २० मार्च २०२६ पर्यंत ई-मेलद्वारे सादर करण्यास बजावण्यात आले आहे. प्रशासकीय कामात दिरंगाई आणि वरिष्ठ कार्यालयातील कर्मचाऱ्यांशी केलेले असभ्य वर्तन यामुळे विद्यापीठ वर्तुळात मोठी खळबळ माजली आहे. आता यावर अकोला कृषी विद्यापीठ प्रशासन काय पाऊल उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## तो प्रशांत गेला तरी कुठे ?

कृषी विद्यापीठातील वादग्रस्त असलेला प्रशांत गेल्या काही दिवसांपासून कुठलीही पुर्व सुचना न देता गायब असून त्याने अधिकृत सुट्टी काढली आहे काय अशी विचारणा होत आहे. त्याच बरोबर महिला कर्मचाऱ्याची तक्रार न नोंदविणाऱ्या अधिकाऱ्यावर विद्यापीठ प्रशासन काही कारवाई करणार आहे की नाही अशी विचारणा होत आहे. त्या महिला कर्मचाऱ्यांची प्रकृती चिंताजनक असून तिची चौकशी करण्याची तसदी विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी घेतली नसल्याची माहिती समोर येत आहे.

# .. तर मग गॅस एजन्सीसमोर रांगा कशासाठी?

## जिल्ह्यात गॅस पुरवठा पुरेसा तरीही नागरिकांची उन्हात होरपळ सुरूच



**प्रतिनिधी १ एप्रिल**

**अकोला :** जिल्ह्यात गॅससह इंधनाचा तुटवडा नाही असे जिल्हा प्रशासनाकडून वारंवार सांगण्यात येत आहे. असे असतानाही वास्तव चित्र मात्र बदलेले दिसत नाही. आजही अनेक गॅस एजन्सीसमोर नागरिकांच्या जीवघेण्या रांगा सकाळपासूनच लागलेल्या दिसून येत आहेत. अनेकांना बुकिंग केल्यावरही १० ते १५ दिवस गॅस सिलिंडर मिळत नाही, याच्या मागील कारणांचा शोध घेण्याची वेळ आता आली असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

जिल्ह्यासह शहरातील काही गॅस एजन्सीमार्फत घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत आणि घरपोच सुरू आहे. मात्र अनेक एजन्सी नागरिकांना घरपोच डिलिव्हरी देण्यास असमर्थ ठरत आहेत. यापेक्षा भयानक स्थिती ग्रामीण भागातील झाली आहे. तेथील सीएससी सेंटरवर नागरिकांना आता गॅस पुरवठा होणे बंद झाले आहे. त्यांना आर्थिक भार सोसत शहराच्या ठिकाणी येऊन दुपारपर्यंत रांगेत उभे राहून गॅस सिलिंडर घ्यावे लागत आहे. तेही मिळेल की नाही याची शाश्वती नाही. पुन्हा दुसऱ्या दिवशी तोच दैनंदिन कार्यक्रम ठरलेला आहे. या प्रकारामुळे नागरिक अगतिक झाले आहेत. तर दुसरीकडे जिल्हा प्रशासन म्हणते की जिल्ह्यात घरगुती गॅसचा सुरळीत पुरवठा सुरू आहे. या विरोधाभासामुळे सर्वसामान्य नागरिकांना मात्र उन्हा-तान्हात होरपळ सहन करीत आपली दैनंदिन गरज भागविण्यासाठी सकाळपासूनच रांगेत उभे राहावे लागत आहे.

### व्यावसायिक आले चूल अन् भट्ट्यांवर!

व्यावसायिक सिलिंडर मिळत नसल्याने अनेक छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना आपले व्यवसाय बंद करावे लागत आहेत. मात्र संपूर्ण महिन्याचा उदरनिर्वाह करण्यासाठी आता त्यांनी पुन्हा आपले व्यवसाय सुरू केले आहेत. त्यासाठी ते चूल आणि भट्ट्यांचा आधार घेत असून, लाकूड, कोळसा याचा उपयोग करीत आहेत. त्यामुळे त्यावर काम करणारे कारागिर अतिरिक्त पैसे मागत आहेत किंवा काम करण्यास नकार देत आहेत. कारण आधीच उन्हाचा पारा त्या भट्टीजवळ बसणे त्यांना असह्य होत आहे. त्यामुळे व्यावसायिक दुहेरी अडचणीत सापडले आहेत.

# प्रशासनाने चार दिवसांत काढले ९५१ जीआर!

**प्रतिनिधी १ एप्रिल**

**मुंबई** : आर्थिक वर्षाच्या अखेरीस प्रशासनाची लगीन घाई दिसली. मंत्रालयात मार्च एंडचा धमाका दिसला. या काळात शासन निर्णय घेण्याचा एकच सपाटा सुरु झाला. चार दिवसात ९५१ शासन निर्णय जारी झाले. हा एक रेकॉर्ड मानल्या जात आहे. सुट्टीचे दिवस असताना झाडून सर्व प्रशासन कार्यालयात कामाला जुंपले होते. सर्वच जण ऑन ड्युटी होते. सुट्टीच्या दिवशी मंगळवारी २६७ जीआर निर्गमित करण्यात आले. सरकारच्या या तत्परतेमुळे वर्षाअखेरीस अनेक निधी खर्चाची तरतूद झाली. तर काही कामं मार्गी लागले. शासनाच्या विविध विभागात जीआर काढण्याचा धडका दिसला.मार्च अखेरीस शनिवारी, रविवार आणि मंगळवारी महावीर जयंतीनिमित्त सुट्टीचे दिवस होते.

# अकोला पोलीस दलाची इभ्रत वेशीला

## पोलीस अधिकारी निलंबित, फरार

**प्रतिनिधी १ एप्रिल**

**अकोला:** अकोला पोलीस दलात एका खळबळजनक प्रकरणामुळे मोठी खळबळ माजली आहे. पोलीस कोठडीत असलेल्या एका महिला आरोपीकडे तिच्या मुलीला आपल्याकडे पाठवण्याची मागणी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याचे कारनामे समोर आले आहेत. याप्रकरणी पोलीस अधीक्षकांनी तातडीने पावले उचलत वादग्रस्त पोलीस अधिकारी राजेश जाधव याला निलंबित केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका गुन्ह्यात महिला आरोपी पोलीस कोठडीत असताना, राजेश जाधव याने त्या महिलेकडे तिच्या मुलीला पाठवण्याची अश्लील गळ घातली. ही बाब जेव्हा इतर पोलीस कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आली, तेव्हा वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी संबंधित ज्युनिअर कर्मचाऱ्यांची आणि अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघडणी केली. खाकी वर्दीला काळीमा फासणाऱ्या या मागणीमुळे पोलीस वर्तुळात तीव्र संताप व्यक्त होत आहे. लॉकअपमध्ये बंद असलेल्या या महिला आरोपीच्या मुलीला पाठविण्याची गळ घातल्या गेली. त्यानंतर या महिला आरोपीने ती गुन्हेगार असून तिच्या मुलीचा कुठलाही संबंध नसल्याचे सांगत लॉकअपमध्येच अश्रु ढाळले.

### वादग्रस्त इतिहास आणि कारवाई

राजेश जाधव हा अधिकारी यापूर्वीही पोलीस दलात अत्यंत वादग्रस्त ठरला आहे. त्याच्या वर्तणुकीमुळे आणि विविध कारणांमुळे यापूर्वीही त्याला एक-दोन वेळा निलंबित करण्यात आले होते. मात्र, तरीही त्याच्या वागण्यात सुधारणा झाली नसल्याचे या ताज्या प्रकरणावरून स्पष्ट होत आहे. कायम स्वरुपी घरी बसविण्याची गरज असून अकोला पोलिस दलाची या मुळे नाहक बदनामी झाल्याची चर्चा जनसामान्यांमध्ये आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत अकोल्याचे पोलीस अधीक्षक यांनी राजेश जाधव याला तत्काळ निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत. या घटनेमुळे अकोला पोलीस दलाची प्रतिमा मलिन झाली असून, 'रक्षकच भक्षक' बनल्याची चर्चा आता सर्वसामान्यांमध्ये रंगली आहे. पोलीस दलाची इभ्रत अशा प्रकारे वेशीला टांगली गेल्याने आता या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे.




# अशोक खरात प्रकरण ; मुलाला अटक, पत्नी फरार!

**प्रतिनिधी १ एप्रिल**


**नाशिक** : भोंदूगिरी आणि फसवणुकीच्या प्रकरणात अटकेत असलेल्या अशोक खरात प्रकरणात नवे धक्कादायक तपशील समोर येत आहेत. अशोक खरात पोलिसांच्या ताब्यात असताना त्याच्या मुलालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मात्र त्याची पत्नी कल्पना खरात सध्या घरातून बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, पोलिसांनी कल्पना खरातलाही अटक करण्याची तयारी सुरू केली असून तिचा शोध घेण्यात येत आहे. या प्रकरणात केवळ खरात कुटुंबच नव्हे, तर काही डॉक्टर, सोनोग्राफी सेंटर आणि मेडिकल स्टोअर्स देखील एसआयटीच्या रडारवर असल्याचे समजते.

शिर्डी येथील जमीन खरेदी व्यवहारात झालेल्या कथित गैरव्यवहारप्रकरणी अशोक खरातसह त्याची पत्नी कल्पना खरातवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात एकूण पाच जणांविरुद्ध फसवणूक आणि सावकारी अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणात आरोपी अरविंद बावके आणि किरण सोनवणे यांना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तसेच, कल्पना खरात आणि अशोक तांबे यांनाही लवकरच अटक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.




CMYK CMYK

# मोर्णाकाठच्या वैशाख वणवा



*दुरच्या शहरात स्थिरावलेल्या मुळच्या अकोलेकर मित्राने फोनवर बोलतांना परवा उत्सुकतेनं विचारले, अकोल्यात तर चांगलंच उन तापू लागलं असेल नं आता ? त्याच्या प्रश्नाने वैशाखातल्या रम्य आठवणींचे प्रतिध्वनी कितीतरी वेळ झंकारत राहिले मनात. भुतकाळातल्या ऊन्हाळयाच्या असंख्य आठवणींनी मनात गर्दी केली. अगदी सिनेमातल्या फ्लॅशबॅक सारख्या किती गोष्टी आठवत राहील्या.. उष्णतेने भाजुन काढलेल्या दिवसानंतर सायंकाळी विहीरीच्या थंडगार पाण्यात निवांत डुंबत रहावं तसं त्या आठवणींमध्ये मी रमुन गेलो..*

*डिसेंबर सरुन जानेवारी लागला की, बदलत्या ऋतुमानाची अस्वस्थ करणारी चाहुल लागे.. उन्हाळयाच्या अनुभवातुन प्रत्यक्ष जातांना होणा-या त्रासापेक्षाही तो सुरु होणार असल्याच्या कल्पनेने माणसं आधीच जास्त घामाघुम होऊन जात. त्यातुन अकोल्याचा उन्हाळा हे जरा जास्तच खतरनाक प्रकरण होतं. अर्थात त्याचा धसका अकोलेकर सोडून इतर गावच्या लोकांनी जास्त घेतलेला असे. जसं 'पुण्यात खुप गर्दी आहे' हे पुणेकर सोडून बाकी इतरांना वाटतं तसं अकोल्याच्या उन्हाळयाची बदनामीही इतरांनीच अधिक केलेली.*

अर्थात इतर गावचे लोक अकोल्याच्या उच्चांकी तापमानावर 'जळत' असले तरी जातिवंत अकोलेकर मात्र आपल्या तापमानाचा स्कोअर इतरांना अभिमानाने सांगत राहतो. त्यातुनही नको असलेला पाहुणा टाळायचा तर, सेंटीग्रेड पेक्षा फॅरनहीटच्या मापातले शतकी आकडे सांगण्याची कला त्याला अवगत आहे. अर्थात ३०-३५ डिग्रीत वावरणा-या शहरातली माणसं एरव्ही सुध्दा इथल्या उन्हाच्या सावलीलाही उभी रहायची नाहीत हे ही तेवढंच खरं..

तर, सुरुवातीला ज्याचं आगमन अनिच्छेनं स्विकारलं जाई तो उन्हाळा पुढे मात्र आम्हाला दिवसागणिक आवडू लागे. सतत गर्मी, डासांचा हैदोस , लाईटचं वारंवार जाणं , दिवसभर बंदीस्त घरात राहणं इ.इ. हे सगळे तोटे तराजुच्या एका पारडयात टाकले तरी शाळेला सुटया आणि दफ्तरं खुंटीवर' या दोनच गोष्टीं असलेलं दुसरं पारडंच वजनदार ठरे. थोडक्यात शाळेच्या जाचापासुन होणारी सुटका हे लहानपणी उन्हाळा आवडण्याचं सगळयात महत्वाचं कारण होतं.

नव्या वर्षाच्या आरंभी जानेवारीतच मार्गशीर्ष मार्गस्थ होवुन गेलेला असे. तीळसंक्रांत झाली की, पाठोपाठ महाशिवरात्रीला श्री राजराजेश्वर मंदिरात उसळलेली गर्दी आणि जयहिंद चौकापासुन ते पार किल्ल्यापर्यंत रस्त्यावर भरलेली जत्रा सरली की फेब्रुवारीच्या आसपास माघही माघारी फिरे. हरब-यातले कोवळे हिरवेगार दाणे आता पिवळे झालेले असत अन् वांगेबटाटयाच्या किंवा कोहळयाच्या तर्रीदार भाज्यांचे भंडारेही मागे पडलेले असायचे.. पहाटेची थंडी हुडहुडी भरवेनाशी झाल्याने स्वेटरं-मफलरांची रवानगी सज्जावरच्या गाठोडयात होवुन जाई. सायंकाळी येणा-या हवेच्या झुळका आता सुखद वाटू लागत.. तिकडे शाळेत एक्स्ट्रा पिरेड,आयएमपी इ. इ. मार्गाने अभ्यासक्रमाच्या लाटा उचंबळत परिक्षेच्या खडकांकडे सरकू लागलेल्या असायच्या. पहाटेच्या अंधारात घरांच्या खिडक्या बल्बच्या प्रकाशांनी उजळलेल्या दिसल्या की पोरं अभ्यासाला उठली आहेत हे रामप्रहरी फिरायला निघालेली माणसं ताडून घेत. तोंडी परिक्षेसाठी कविता पाठ करुन आणि दहीभात खावून शाळेत जाणं होई. परिक्षा झाली की सायकल पिटाळत गायगावकडे जात असतांना पानं झडून गेलेल्या पळसाच्या काटक्या देहावर अंगभर उमलू लागलेली भरदार केशरी फुले दृष्टीस पडली की छान वाटे पण हिवाळयाच्या विरहसंकेतानं मन उदास होई.. कधी कधी जोराचा वारा सुटे. शिशिराच्या पानगळीनं रस्ते आणि अंगणं वाळलेल्या पानांनी भरुन जायची आणि निष्पर्ण फांद्यांमुळे झाडं ओकीबोकी वाटतं. गवत सुकून पिवळं पडून जाई. अशा रितीने आपण आता लवकरच उन्हाळयाच्या ठअंगारठऋतुत पोचणार आहोत याचे संकेत एक एक करीत सभोवतीचा निसर्ग आपल्याला देत राही. एव्हाना होळीची तयारी सुरु होई. दोन्ही हातांचे अंगठे आणि तर्जनी जोडून तयार होणा-या चौकोनात गाई-म्हशींच्या उग्र वासाच्या शेणाचा लगदा थापायचा. मध्ये बोटानं छिद्र पाडायचं. त्याच्या चाकोल्या तयार करायच्या आणि कडक उन्हात वाळवून दोरीत ओवून त्याची माळ बनवायची.. होलीकेच्या अग्नीत चाकोल्यांची राख झालेली माळ दिसली की धन्य वाटे. दुसरीकडे वयाने मोठया असलेल्या पोरांवर लाकडं चोरुन आणण्याची जबाबदारी असे. कुणाच्या कुरकुरणा-या खाटेचा ठावा, , कुणाची मोडकी घडवंची, एखाद्या पडक्या कौलारु घरावरच्या नाटा किंवा बांबु अन् टालवाल्याने फोडून ठेवलेली सरपणाची लाकडं.. सुरुवातीला या सगळ्याचा डाटा गोळा केला जाई. मग त्या त्या वस्तु चोरुन आणण्याची पात्रता धारण करणारे पोट्टे हेरून त्या कामाकरिता 'अपॉईंट' केले जातं. आणि अशा रितीने चोरुन आणलेलं साहित्य सर्व्हीस लाईनमधल्या एखाद्या आड कोप-यात गोळा केले जाई. या धडपडीत जीव थकला की दुपारी डोळा लागे. रणरणत्या उन्हानं सुनसान पडलेल्या गल्लीतून दुपारी चारसाडेचारच्या सुमारास वाजत चाललेल्या कुल्फीवाल्याच्या घंटेनं झोप मोडे. मात्र घंटेचा तो ध्वनी म्हणजे उन्हाळयाची पालखी जवळ येत असल्याची दवंडीच असे. अखेर फाल्गुन पौर्णिमेला सर्वत्र होळया पेटल्या एकदाच्या की, अधिकृत घोषणा केल्यासारखे लोक एकमेकांना सांगत, झाला रे बॉ आता उन्हाळा सुरु... होळी झाली की, मग अंगणात किंवा गच्चीवर झोपायला जायचे रितसर ऐलान होवुन जाई.

दुस-या दिवशी मग रंगपंचमी आणि धुळवड.. जुन्या शहराच्या संस्कृतीत साजरी केली जाणारी धुळवड मला जणु दसरा या सुसंस्कृत सणाची व-हाडी आवृत्ती आहे असे वाटे. दस-याला लोक एकमेकांना अलींगन देतात, छातीशी धरतात आणि स्नेहपूर्वक शुभेच्छा देतात. धुळवडच्या दिवशी हेच प्रेम वेगळया प्रकारे व्यक्त होई. असं म्हणण्यापेक्षा एकमेकांवरचे प्रेम एवढे उतु जाई की तुफान शिवीगाळ होत असे. आणि माणसं अंगचटीलाही येत. एकमेकांच्या माता भगिनींची आदरानं ओथंबून आलेली आठवण शब्दातुन व्यक्त व्हायची. ये लाल है...... किंवा हा उभाच कसा....अशा काही ओव्यांचे जाहीर पठण करीत आचरट पोट्टयांचे टोळके आख्ख्या जुन्या शहरात प्रभातफेरी काढल्यासारखे फिरत राही. प्रेतयात्रा देखील काढल्या जात. भांगेची गोळी खाल्ल्याने आपुले मरण पाहिले म्या डोळा हे संत वचन मेंदूत भिनलेला एखादा 'जिंदा'दील महात्मा तिरडीवर 'झोपायला' एका पायावर तयार होई. प्रेतयात्रा गल्लीत शिरली की लोक घरात पळत आणि घराच्या खिडक्या दरवाजाआड लपुनच पाहणे पसंत करीत. या प्रसंगी लोक नेहमीप्रमाणे प्रेताला नमस्कार करण्याऐवजी खांदेक-यांनाचा ढोपरापासून हात जोडत. या हौशी मरण'यात्रेत उच्चारलेल्या शिव्या नंतर वर्षभर कोणीही कोणाला द्यायच्या नाहीत असा अलिखित नियम होता. आणि लोक तो श्रध्दापूर्वक पाळत. 'त्या' विशिष्ट शिव्या वर्षभर नाही ऐकु यायच्या मग. अर्थात प्रसंगानुरुप आपल्या अस्सल भावना समोरच्यापर्यंत पोचवू शकणा-या समर्पक शिव्यागाळयांचा मुबलक स्टॉक सर्वत्र उपलब्ध असल्याने तुटवडयाचा काही विषयच नव्हता.. आणि रंगांचे प्रकार ? गुलाबी पिवळा वगैरे पुळचट रंग सोडा हो.. वार्निश, प्रिंटींगची शाई, वंगण आणि याउपरही आणखी प्रेम दाटून आलं तर गटाराच पाणी असे. त्याच निर्मल जलात माणसं बुचकळुन काढली जात. ज्याला गटाराच्या पाण्यात बुडवलं तोही मग आंघोळीपश्चात म्हटल्या जाणा-या स्तोत्राच्या भावभक्तीने शिव्याशापांचे मंत्रोच्चार करीत राही. या सगळयातला विकृतीचा अंश वेगळा काढण्याचं तारतम्य ठेवता आलं की, मनाच्या भिंतींवर लागलेली व्देष, मत्सराची जळमटं झाडली जावून माणसांची मन स्वच्छ होवुन जात. सायंकाळी स्वराज्य भवनाच्या मैदानात भरणारं मुर्ख संमेलन हा धुळवडीच्या दिवसाचा अकोला स्टाईलने केलेला उत्कट आणि अफलातून असा समारोप असे. परीक्षा आणि अभ्यासातुन मुक्त झालेली पोरं, माहेरी जायचा कल्पनेनं हुरळून गेलेल्या त्यांच्या आया, बरोबरीची चुलत, मामे, मावस आणि आतेभावंडं आता आपल्या घरी रहायला येणार याचा आनंद,,, मस्तपैकी फिरायचं, भेळपुरींच्या गाडीवर जायचं, उसाचा रस, आईसक्रीम .. सोबतीला गप्पा, सिनेमे पहायचे याचं प्लॅनिंग होत असे. (धॅंक गॉड..समर कॅंप वगैरे असले सुट्टीचा आनंद नासवणारे प्रकार नव्हते तेव्हा) दिवसभर सर्वत्र रणरणत्या उन्हाचे राज्य असे. अंगाची लाही लाही आणि घरातही तुफान गर्मीचे राज्य असे. खरं तर कुलर हा त्याकाळी चैनीचा विषय होता अन घरात फ्रिज असणं हा विचार तर स्वप्नांच्याही पलीकडचा होता. तट्टयांच्या पाणपोईतल्या लाल कपडा गुंडाळलेल्या रांजणातलं थंडगार पाणी, लिंबु शरबत, सिटी कोतवालीसमोरचं केशरी गोल्ड स्पॉट, पाच पैशांच्या दोन असलेल्या आईसकांडया नाहीतर रंगीन गोला हेच लय होत..आणखी एक.. ते कै-यांची माळ गुंडाळलेल्या माठातलं आंबट तिखट पाणीठ काय गजब...! ( याचं पेटंट तर अकोलेकरांनीच क्लेम केलं पाहिजे.) फार क्वचित जुन्या बसस्टँड समोरील 'हरीमोर'ची लस्सी म्हणजे एकदम हाईट.. सुखाची परमावधी...दिवसभर लोकं घरात जीव लपवुन सायंकाळ होण्याची वाट पहात. साडेपाच सहाच्या आसपास सुर्यानं आपल्या किरणांच्या घडया घालुन ठेवायला सुरुवात केली की त्याचा कडकडीत कर्फ्यु हल्ल्यात माणसं हळुहळु बाहेर पडत. त्यावेळी अकोल्याच्या जीवनदायिनी मोर्णेचंपात्र उन्हाळयातही पाण्यानं भरलेलं राही. सकाळची उन्हे पडली की चमकू लागलेले तळातले गोटे पुलावरुन नजर टाकली की लख्ख दिसत. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची हिरवीगार वनराई देखील दुर दुर पर्यंत पसरलेली होती.. रात्री आठ साडेआठ पर्यंत उन्हाच्या गरम झावा चालतं. मग मात्र बाहेरुन घामाझोकळ होवुन आलेल्या लेकराचं तोंड आईने आपल्या ओलसर पदराने पुसुन काढावं तसं मोर्णेकाठचं हे गाव गार हवेच्या सुखद झुळुकांनी भरुन जाई. सतत थंड वारा वहात राही आणि दिवसभराच्या काहिलीनं त्रस्त झालेला जीव शांत होई. खिराडीवरुन सोडलेली बादली विहीरीच्या थंडगार पाण्यानं भरुन वर आली की तशीच्या तशी डोक्यावर रिती होई. पोहण्याची शौकीन मंडळी अनिकटवर जात. तिकडून आलं की, मग जेवणं. बरेचदा रात्रीची अंगत पंगत पण गच्चीतच व्हायची. आणि त्यानंतर एक एक करत वाडयातली सगळी बि-हाडं घरच्या पाहुण्यांसह गच्चीवर झोपायला यायची. तिथं उशीरापर्यंत गप्पांचे फड रंगत. गाणे, नकला, चेष्टा मस्करी, एखाद्या कोप-यात पत्त्यांचा डाव नाहीतर कॅरमचा गेम रंगात आलेला असे. या सगळ्यांची मिळून एक अनोखी मैफिल रंगत असे... संपन्न सार्वजनिक जीवनाचं भरण पोषण करणारा एक अनौपचारीक सांस्कृतिक कार्यक्रमच असे तो. रात्र पुढे सरकत जाई आणि यथावकाश मग आपापले जगण्याचे संघर्ष काही तासांसाठी 'पॉज' वर ठेवुन सगळी जण गाढ झोपेच्या स्वाधीन होवून जात. एखाद्या मध्यरात्री जाग आली की हवा स्तब्ध आणि झाडं निश्चल झालेली दिसत. तहानेनं घसा कोरडा पडल्याचं जाणवे आणि उशीच्या बाजुला ठेवलेल्या घागरीतलं थंडगार पाणी आपण गटागटा प्यायचो आणि डवरुन आलेला घाम पुसून पुन्हा अंथरुणावर अंग टाकायचो, तर विस्तीर्ण पसरलेल्या वडाच्या झाडाकडे लक्ष जाई. तेही जागं असुन आपल्या देहाच्या कारुण्यमयी डोळयांनी आम्हा सगळयांकडे पहात असल्याचा भास होई. गर्मीनं सगळयांच्या झोपा चाळवल्या गेल्याचं त्याच्या लक्षात आलं असावं काय ? असेच दिवस पुढे जात रहात. मे महिन्याचा उत्तरार्ध येई. सुट्टयांचे दिवस एक एक करत कमी होत चालले हे जाणवून अस्वस्थ वाटे. अन्.. अन् मग एके दिवशी रणरणत्या दुपारी झोपेतुन जाग आली की खिडकीबाहेर अंधारुन आलेलं दिसे. ग्रीष्मानं आपला पसारा आवरायला सुरुवात केल्याचा संकेत असे तो. एवढया दिवसांपासून कोपलेला सुर्य आता हळुहळु क्रोध ओसरलेल्या ऋषिसारखा शांत भासू लागे. अधुनमधुन सायंकाळी आकाशात दूर लांबवर वीजांच्या आवाजरहीत लवलवत्या रेषा चमकतांना दिसत. आंब्याला पूर्वीची चव येईनाशी होई अन् उसाच्या रसाची तृष्णाही वाटेनाशी झालेली असे. मोठया बाजारात आता बाया बापडयांचा गराडा पडलेले पक्क्या कै-यांचे ढिग दिसु लागत. लोणच्याच्या फोडींच्या रुपानं जणु ग्रीष्माचा बहारदार 'काळ'च बरणीत भरुन घेतला जाई. मुक्कामी असलेले पाहुणेही एव्हाना परतीच्या प्रवासाला लागलेले असत. गच्चीवर झोपायला येणा-यांची संख्या रोडावत जाई. झोपलो तरी अधून मधुन पावसाचे थेंब येत.. गाद्या आवरून घरात गेलं की हे थेंब येणं हटकोरासारखे थांबून जाई. कॅरमच्या चारदोन सोंगटयाही एव्हाना हरवून गेलेल्या असत अन् बावन्न पत्त्यातला इसपिकचा राजा नाहीतर बदामची राणी पण फाटून गेलेली असे. एकुणच ग्रीष्मानं आपल्याला दिलेला निखळ आनंदाचा पत्ताच आता हरवत चाललेला असे. एके दिवशी अभावितपणे खुंटीवर टांगलेल्या दफ्तरावर नजर जाई अन घरापासुन शाळेपर्यंतचा नीरस रस्ता डोळ्यांसमोर तरळू लागे. शाळेचे फाटक, वर्गाची खोली, फळा.. खडू, डस्टर , समोर टांगलेली घंटा.. ते कवायतीच मैदान... या सगळयांच्या एवढ्या दिवसांपासून धुसर झालेल्या मेंदुतल्या प्रतिमा चष्म्याच्या काचा पुसल्यावर लख्ख दिसू लागावं तशा एक एक करत स्पष्ट होवू लागत.. मान्सुनला अवकाश असला तरी अधुनमधुन आभाळ दाटून येई.. आणि सरी कोसळू लागत . मन अधिकच उदास व्हायचं. पावसाच्या त्या हलक्या सरी जणू ग्रीष्माच्या उत्तरोत्तर रंगत गेलेल्या बहारदार मैफिलीची भैरवी होवुन येत.

धनंजय देशपांडे
अकोला
मो. ९८५०३२२७३७

सुखासीनतेची श्रीमंत भावना आणि विरहाची व्याकुळ वेदना एकाच स्वरात गुंफुन आलेली भैरवी असे ती. कुणालाही ऐकु जाणार नाही अशा आवाजात मी मनोमन रडत राही. मात्र आपला गच्च धरुन ठेवलेला हात माझ्या हातून व्रतस्थ मनाने सोडवुन घेत ग्रीष्मानं केव्हाच परतीची वाट धरलेली असे. दुरवर नजर टाकावी तिथपर्यंत त्याच्या परतीच्या पावलांचे ठसे तेवढे उमटलेले दिसत. मनोमन मला उमगायचं की वरवर उग्र दिसणारा पण अमाप आनंद आणि सुख घेवून आलेला ग्रीष्म ?तु एव्हाना आपल्याला सोडून खुप दुर गेलाय..शेत, मळे, रस्ते आणि जंगलं ओलांडून कितीतरी पुढे. पार तिकडे गायगावच्याही पुढं.. आपल्याच देहातुन उमललेल्या गर्दकेशरी फुलांच्या मातीत मिसळलेल्या छिन्नविच्छिन्न काळपट पाकळयांकडे व्रतस्थ डोळयांनी पहात बसलेल्या निस्तेज पळसाची झाडं ओलांडून त्याही पुढे .. निर्जन अरण्यात... साता समुद्रापार.. किंवा कदाचित आकाशापल्याडही.. खुप दुर.. खुप खुप दुर गेलाय तो... !!

# देश, सत्ता आणि सामान्य माणसाचा प्रश्न

*आज आपण ज्या देशात जगत आहोत, त्या देशाची ओळख लोकशाही म्हणून आहे. लोकांच्या मतांनी निवडून आलेले प्रतिनिधी देश चालवतात. मग हे प्रतिनिधी केंद्रातील खासदार, मंत्री, राज्यातील मुख्यमंत्री, आमदार, तसेच जिल्हा परिषद, ग्रामपंचायत पातळीवरील पदाधिकारी हे सर्व लोकांसाठीच काम करण्यासाठी निवडले जातात. परंतु आज एक गंभीर प्रश्न आपल्या समोर उभा आहेः खरोखरच ही सत्ता सामान्य माणसाच्या भल्यासाठी वापरली जाते का?*

प्रत्येक माणूस या जगात कायमचा राहणार नाही. एक दिवस प्रत्येकाला जावेच लागणार आहे. मग आपल्या हातात असलेली सत्ता, अधिकार आणि संधी यांचा उपयोग आपण समाजासाठी, गावासाठी, जिल्ह्यासाठी, राज्यासाठी आणि देशासाठी का करू नये? ही जाणीव प्रत्येक सत्ताधाऱ्याला असणे अत्यंत गरजेचे आहे.

आपल्या देशासाठी लाखो वीरांनी बलिदान दिले. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, सुभाषचंद्र बोस, लोकमान्य टिळक यांसारख्या महान देशभक्तांनी स्वातंत्र्यासाठी आपले प्राण अर्पण केले. त्यांनी एक समृद्ध, न्याय्य आणि समानतेवर आधारित भारताचे स्वप्न पाहिले होते. परंतु आजची परिस्थिती पाहिली तर त्या स्वप्नांपासून आपण दूर जात आहोत असे वाटते. सरकारी कर्मचारी वर्गासाठी वेतनवाढ, महागाई भत्ता, सुविधा यांचा विचार केला जातो, हे योग्यच आहे. पण त्याच वेळी शेतकरी, शेतमजूर आणि दारिद्र्यरेषेखालील लोक यांच्याकडे दुर्लक्ष होताना दिसते. शेतकरी आपल्या उत्पादनाचा योग्य भाव ठरवू शकत नाही. शेतमजूर दिवसभर कष्ट करूनही अत्यल्प मजुरीवर जगतो. एखादी ६०-७० वर्षांची आजी अजूनही शेतात राबते, पण तिच्या कष्टाचे मूल्य कोणी विचारात घेत नाही.

यामागचे एक मोठे कारण म्हणजे हे लोक असंघटित आहेत. त्यांच्याकडे मोठे संघटन नाही, त्यांच्याकडे आवाज पोहोचवण्याची ताकद नाही. त्यांच्या रोजच्या जगण्याच्या संघर्षामुळे ते एकत्र येऊ शकत नाहीत. एका दिवसाची मजुरी गमावणेही त्यांच्यासाठी मोठा प्रश्न असतो. मुलांचे शिक्षण, आरोग्य खर्च, घरखर्च, वीजबिल या सगळ्या जबाबदाऱ्यांमुळे ते कायम तणावात जगत असतात.यामुळेच सत्ताधाऱ्यांनी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. योजना तयार करणे पुरेसे नाही, त्या योग्य लोकांपर्यंत पोहोचणे अधिक महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांसाठी असलेली योजना शेतकऱ्यांपर्यंतच मर्यादित राहिली पाहिजे. अपंगांसाठी असलेली मदत अपंगांनाच मिळाली पाहिजे. विधवा महिलांसाठीच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. बांधकाम कामगारांसाठी असलेली योजना खऱ्या कामगारांनाच मिळाली पाहिजे. यामध्ये इतर लोकांचा हस्तक्षेप होऊ नये, याची जबाबदारी सरकारने घ्यावी. देशाची खरी ताकद ही त्याच्या सामान्य नागरिकांमध्ये असते. जर खालच्या स्तरावरील लोक दुर्लक्षित राहिले, तर देशाची प्रगती अपूर्ण राहते. म्हणूनच प्रत्येक नेत्याने, प्रत्येक अधिकाऱ्याने आणि प्रत्येक सत्ताधाऱ्याने आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे.शेवटी, देश हा फक्त मोठ्या शहरांचा, श्रीमंत लोकांचा किंवा सत्ताधाऱ्यांचा नसतो तो प्रत्येक शेतकऱ्याचा, प्रत्येक कामगाराचा, प्रत्येक सामान्य नागरिकाचा असतो. त्यांच्या आयुष्यात बदल घडवणे हेच खरे राष्ट्रसेवेचे कार्य आहे. आणि हेच कार्य प्रामाणिकपणे झाले, तरच आपण खऱ्या अर्थाने प्रगत आणि न्याय्य भारत घडवू शकू.सर्वसामान्यांच्या समस्या आणि सरकारची जबाबदारी आजच्या समाजात एक मोठा वर्ग असा आहे, ज्यांच्याकडे स्वतःची शेती नाही. हे लोक दुसऱ्यांच्या शेतात मजुरी करतात किंवा रोजगारासाठी बाहेरगावी जाऊन काम करतात. त्यांच्या जीवनात अनेक अडचणी आहेत, परंतु त्यांच्या प्रश्नांकडे सरकारकडून पुरेसे लक्ष दिले जात नाही, ही चिंतेची बाब आहे.

निवृत्ती तायडे
हिवरखेड, ता. तेल्हारा
मो. ७७०९५१७०१९

अशा कष्टकरी लोकांना रोजच्या जगण्यासाठी संघर्ष करावा लागतो. त्यांच्या उत्पन्नावर मर्यादा असतात, त्यामुळे महागाईचा त्यांच्यावर मोठा परिणाम होतो. उदाहरणार्थ, लग्नासाठी लागणाऱ्या गोष्टी विशेषतः सोन्याचे दागिने यांच्या वाढत्या किमतीमुळे त्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. ‘मंगळसूत्र’ सारखी आवश्यक गोष्टसुद्धा घेणे त्यांच्यासाठी कठीण बनते.याशिवाय, काही कुटुंबांना दोन वेळच्या जेवणाचीही चिंता असते. अशा वेळी सरकारने त्यांच्या मूलभूत गरजांकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. रेशन दुकानांमधून मिळणाऱ्या धान्याच्या गुणवत्तेबाबतही अनेक तक्रारी आहेत. जे अन्न सामान्य नागरिकांना दिले जाते, ते स्वच्छ, पौष्टिक आणि खाण्यायोग्य असणे अत्यंत आवश्यक आहे. लोकांच्या आरोग्याशी कोणत्याही प्रकारे तडजोड होऊ नये.सरकारने सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या समजून घेतल्या पाहिजेत आणि त्यावर योग्य उपाययोजना केल्या पाहिजेत. समाजातील प्रत्येक घटकाला समान दृष्टीने पाहणे आणि त्यांच्या गरजांची पूर्तता करणे ही सरकारची जबाबदारी आहे. शेवटी, थोडक्यात सांगायचे झाले तर ‘थोडे द्या पण चांगले द्या’ ही भावना लक्षात घेऊन, सर्वसामान्यांच्या जीवनात सुधारणा घडवून आणणे हीच खरी प्रगती ठरेल.

# श्रद्धेचा बाजार आणि राजकारणाची सावली

*भारतीय समाजात धर्म आणि अध्यात्म यांची दीर्घ परंपरा आहे. श्रद्धा, संस्कार आणि नैतिक मूल्यांवर आधारित ही परंपरा समाजाला आधार देणारी मानली जाते. मात्र या श्रद्धेचाच गैरफायदा घेत काही तथाकथित बाबा आणि गुरू यांनी धर्माच्या नावाखाली बुवाबाजीचा एक मोठा बाजार उभा केला आहे. लोकांच्या भीती, असुरक्षितता आणि वैयक्तिक समस्यांचा फायदा घेत चमत्कार, तंत्र-मंत्र आणि दैवी शक्तींच्या नावाने प्रभाव निर्माण केला जातो. अधिक चिंताजनक बाब म्हणजे अनेकदा या बुवाबाजीमागे राजकीय संरक्षण आणि सामाजिक उदात्तीकरणही उभे असल्याचे दिसून येते.*



भारतात यापूर्वीही अशा प्रकारच्या अनेक घटना चर्चेत आल्या आहेत. चंद्रास्वामी आणि सत्यसईबाबा यांची नावे त्यात वारंवार घेतली जातात. तंत्र-मंत्र, चमत्कार आणि अलौकिक शक्तींच्या दाव्यांमुळे त्यांनी मोठा प्रभाव निर्माण केला. त्यांच्या भोवती मोठा भक्ताचा गट तयार झाला आणि अनेक राजकीय नेते, उद्योगपती व प्रभावशाली व्यक्ती त्यांच्याशी जोडल्या गेल्या. या प्रभावामुळे त्यांच्या विरोधातील अनेक गंभीर आरोप असूनही अनेक प्रश्न पूर्णपणे उघडकीस आले नाहीत. नाशिकमधील अशोक खरात प्रकरणाने हा जुना पॅटर्न पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे. धर्म, अध्यात्म, बुवाबाजी आणि राजकारण यांच्यातील एक धोकादायक संबंध या प्रकरणातून स्पष्ट दिसतो. समाजातील भीती, वैयक्तिक समस्या आणि कौटुंबिक अडचणींचा फायदा घेत लोकांना जाळ्यात ओढणे, त्यांच्या श्रद्धेचा वापर करून मानसिक नियंत्रण मिळवणे आणि त्यानंतर आर्थिक तसेच लैंगिक शोषण करणे ही प्रक्रिया अनेक अशा घटनांमध्ये दिसून येते.

या प्रकारातील महत्त्वाची बाब म्हणजे अशा घटनांमध्ये दोष केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नसतो. त्यामागे अनेकदा एक संपूर्ण सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जाळे कार्यरत असते. ‘दैवी शक्तीं’चा दावा करणारे हे बुवा हळूहळू समाजातील प्रभावशाली घटकांशी संबंध निर्माण करतात. या संबंधांमुळे त्यांना अप्रत्यक्ष संरक्षण मिळते आणि त्यांचा प्रभाव वाढत जातो. परिणामी, श्रद्धेच्या आधारावर उभे राहिलेले हे केंद्र हळूहळू सत्तेच्या आणि स्वार्थाच्या जाळ्यात रूपांतरित होते.या संपूर्ण व्यवस्थेतील सर्वात मोठे बळी ठरतात ते म्हणजे स्त्रिया. समाजरचनेत आधीच असमानता आणि असुरक्षिततेचा सामना करणाऱ्या स्त्रिया अशा बुवाबाजीसाठी सर्वात सोपे लक्ष्य ठरतात. संकटातून मार्ग काढण्यासाठी गेलेल्या अनेक स्त्रिया आणखी मोठ्या संकटात अडकतात. कधी औषध देऊन, कधी ब्लॅकमेल करून, तर कधी कुटुंबीयांना धमक्या देऊन त्यांचे शोषण केले जाते. सामाजिक बदनामीची भीती आणि कुटुंबावर होणाऱ्या परिणामामुळे अनेक महिलांना पुढे येणे कठीण जाते.या पार्श्वभूमीवर समाजाने आणि राज्य व्यवस्थेने गंभीर आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. भारतीय संविधान प्रत्येक नागरिकाला वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवतावाद आणि विचारस्वातंत्र्य विकसित करण्याचे कर्तव्य सांगते. तरीही प्रत्यक्षात समाजात आणि राजकारणात बुवा, बाबा, ज्योतिषी आणि मांत्रिक यांच्या प्रभावाचे चित्र दिसते. ही विसंगती दूर करणे ही केवळ शासनाची नव्हे तर समाजाचीही सामूहिक जबाबदारी आहे.राजकारण्या नेही या वास्तवाकडे प्रामाणिकपणे पाहण्याची गरज आहे. बुवा-बाबांच्या छायेतून बाहेर येत लोकांच्या खऱ्या प्रश्नांवर आधारित, वैज्ञानिक दृष्टिकोनावर उभे असलेले प्रगतिशील आणि उत्तरदायी राजकारण उभे करणे ही काळाची गरज आहे. धर्म समाजाला नैतिक आधार देण्यासाठी असतो; परंतु जेव्हा श्रद्धा विवेकशून्य बनते आणि सत्तेच्या सावलीत येते, तेव्हा तीच श्रद्धा शोषणाचे साधन बनते. म्हणूनच श्रद्धा आणि विवेक यांचा समतोल राखत समाजाने जागरूकतेचा मार्ग स्वीकारणे आवश्यक आहे. अन्यथा श्रद्धेचा हा बाजार आणि सत्तेची सावली लोकशाहीसाठी गंभीर आव्हान ठरू शकते.

प्रफुल्ल मंदा श्रीधर
जिल्हाकार्याध्यक्ष
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अमरावती
मो. नं. ९६६५१८५४२८

सिटी न्यूज अकोला

बुधवार, दि. १ एप्रिल २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# कृषी पुरस्कारांसाठी शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज करता येणार

**अकोला:** शासनाच्या विविध कृषी पुरस्कारासाठी शेतकरी बांधवांना ऑनलाईन प्रणालीवर घरबसल्या अर्ज सादर करता येणार आहे. इच्छूकांनी दि. १५ एप्रिलपूर्वी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी डॉ. मुरली इंगळे यांनी केले आहे. कृषि उत्पादन व कृषि उद्योग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यामध्ये दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात अतुलनीय व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती तसेच संस्थांचा सन्मान महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत करण्यात येतो. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार इत्यादी पुरस्कारांचा समावेश आहे.



शहरात हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते. यासाठी हनुमान मंदिरावर रोषणाई करण्यात आली आहे. तसेच रंगरंगोटी करून परिसर सुशोभित करण्यात आला आहे. गुरूवारी हनुमान जयंती उत्सव सकाळ पासून साजरा केला जाणार आहे. काही वर्षांपासून हनुमान जयंती उत्सव समिती कडून शोभायात्रा काढण्यात येते. जयंती उत्साहाने साजरी व्हावी या उद्देशाने मंदिर व्यवस्थापन तसेच भाविक तयारी करीत आहेत.

## सुकळी नंदापूर भागात पावसाने पिकांचे नुकसान

**अकोला:** सुकळी नंदापूर भागाला अवकाळीचा मोठा तडाखा बसला. पपईसह कांदा, गहु, हरभरा आणि भाजीपाला पिकांचे नुकसान झाले. बळीराजा कोलमडला आहे. ३० मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने संपूर्ण परिसराला झोडपून काढले आहे. निसर्गाच्या या लहरीपणामुळे हाता तोंडाला आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी वर्ग मोठ्या संकटात सापडला आहे. प्राथमिक अंदाजानुसार, पपई, कांदा बीज उत्पादन, मूग, भुईमूग हरभरा, गहु आणि भाजीपाला पिकांचे जवळपास ९० टक्क्यांहून अधिक नुकसान झाले असून, शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे भांडवल मातीत गेले आहे. आता या शेतक-यांना आधार हवा आहे.

## कोतवाली नजीकच्या पुलावरील पथदिवे बंद

**अकोला:** सिटी कोतवाली चौक नजीकच्या पुलावरील पथदिवे तीन महिन्यापासून बंद आहेत. रात्रीच्या वेळी वाहन चालकांना चाचपडत वाहने चालवावी लागतात. तीन महिन्यांपासून पथदिवे बंद असूनही ते सुरू व्हावे म्हणून लक्ष दिले जात नाही. यावरून महापालिका यंत्रणा कशी काम करत आहे हे दिसून येते. मात्र दिरंगाईचा नागरिकांना त्रास सहन करावा लागतो आहे. मुख्य रस्त्यावरील पथदिव्यांची ही स्थिती आहे तर शहरातील अन्य भागात काय अवस्था असेल याविषयी आश्चर्य व्यक्त केले जात आहे. महापालिका प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष द्यावे. तसेच होणारी अडचण दूर करावी अशी मागणी आहे. महत्त्वाच्या रस्त्यावर रात्रंदिवस रहदारी असते. परंतु तरीही या भागात पथदिवे सुरू करण्याकडे महापालिका विद्युत विभागाला वेळ नाही. या विषयी नागरिक नाराजी व्यक्त करीत आहेत.

## सोसाट्याच्या वाऱ्यासह शहरात पाऊस

**अकोला:** अकोला शहरात सोमवारी रात्री अचानक हवामानात बदल झाला. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला.

## बोरमळी येथे हनुमान जयंती सोहळा होणार थाटात

प्रतिनिधी १ एप्रिल

**अकोला:** येथून जवळच असलेल्या बोरमळी येथे श्री हनुमान संस्थान व गावकऱ्यांच्या सहकार्याने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सुद्धा २ व ३ एप्रिल हनुमान जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

२ एप्रिलला हनुमान जयंतीनिमित्त महापंगतीचा व महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे व रात्री बंजारा भजनी मंडळाचा कार्यक्रम होणार आहे तर ३ एप्रिल ला सकाळी ६:०० वाजता हनुमान जी च्या मूर्तीची पूजा करून शोभायात्रा काढण्यात येईल व शोभायात्रेचा समारोप सभा मंडपात करण्यात येईल त्यानंतर भक्तांनी भेट दिलेल्या गुळ नवसाचा महाप्रसादाचा ९ ते ११ वाजेपर्यंत दर्शनासाठी आलेल्या भक्तांना वाटप करण्यात येईल



या उत्सवानिमित्त बोरमळी गावातील बाहेरगावी सेवेत कार्यरत असलेले शासकीय अधिकारी, निम शासकीय अधिकारी कर्मचारी व आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी गाव सोडून बाहेर जाणारे सर्व नागरिक या हनुमान जयंतीला आपल्या कुटुंबासह गावात हजर राहतात. सासरी नांदायला गेलेल्या मुली त्या सुद्धा उत्सवाला गावात दाखल होतात हे येथील वैशिष्ट्य आहे.

विशेष म्हणजे बोरमळी येथील नागरिकांसाठी दिवाळी सणा एवढे महत्व हनुमान जयंतीला आहे बारस मध्ये गावात वृत्त वैकल्प करण्यात येते त्यामुळे १२ दिवस येथे आनंदाचे वातावरण असते गावात प्रकाश मय रोषणाई ध्वनी वितरक यंत्रणा द्वारे बंजारा भजन, गुळ प्रसादाचे वाटप, आणि भव्य शोभायात्रा उत्सवाचे विशेष आकर्षण वाढले आहे. रोज सकाळी संध्याकाळी हनुमान जी ची आरती करण्यात येते तसेच हनुमान जयंतीला महाआरती व महापंगतीचा कार्यक्रम रात्रीला बंजारा भजनी मंडळाचा कार्यक्रम होणार आहे पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान श्री हनुमान संस्थान बोरमळीचे अध्यक्ष बापूराव राठोड व समस्त गावकरी पंच मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## दोनदच्या आसरा मंदिरात यात्रा महोत्सव साजरा

प्रतिनिधी १ एप्रिल

**बार्शीटाकळी:** येथून २५ किलोमीटर अंतरावर दोनद गावात आसरा मातेचे पुरातन मंदिर आहे. देवीची वर्षातून दोन वेळा यात्रा भरते. देवीच्या दर्शनाकरिता दुरून भाविक येऊन नवस बोलतात. ज्या लोकांचे नवस पूर्ण झाले ते नवस फेडण्याकरिता येतात. आसरा मातेचे मंदिर जागृत असून या देवीच्या दर्शनाकरिता अमरावती, नागपूर, यवतमाळ,



परभणी, नांदेड एवढेच नव्हे तर यावेळेस दिल्लीहून लोक दर्शनाकरिता आले होते. आसरा माता देवी दर्शनाकरिता गर्दी झाली होती. या देवीच्या दर्शनाकरिता हजारोच्या दर्शनाकरिता लाईन लागली होती. महिला पुरुष दर्शन करण्या अगोदर नदीपात्रामध्ये आंघोळ करून व त्यांचे जे काही नवस मानलेले होते ते नवस पूर्ण करण्याकरिता आसरा माताचे दर्शन केले. दोनद खुर्द या गावांमध्ये जिकडे आपली नजर गेली तिकडे लोकांचे रोडगे बनून चालू होते. गर्दीचा चोरांनी हात साफ करू नये याकरिता पिंजरचे ठाणेदार गंगाधर दराडे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. अतिशय भव्य स्वरूपात यात्रा भरते. चैत्र नवरात्र उत्सव भक्ती भावाने साजरा केला जातो.

## कावसा येथील शेतात वीज कोसळून आठ मेंढ्या ठार

प्रतिनिधी १ एप्रिल

**कुटासा:** अकोट तालुक्यात सोमवारी संध्याकाळच्या सुमारास वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसामुळे ग्रामस्थांची चांगलीच तारांबळ उडाली.



पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे कुटार तसेच छतावरील टिन पत्रे उडाल्याने दिसुन आले तर बागायतदार शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तर कावसा येथे रात्री ८ वाजताच्या सुमारास भटकर यांच्या शेतात वीज पडून चितलवाडी येथील मेंढपाळाच्या ८ मेंढ्या दगावल्याने नुकसान झाले आहे. शासनाने पंचनामा करून नुकसानग्रस्त मेंढपाळाला शासनाकडून आर्थिक मदत मिळावी अशी अपेक्षा व्यक्त व्यक्त करण्यात येत आहे.

## हिदायत पटेल हत्याकांडातील आरोपींना अटक करण्याची मागणी

◆ पोलीस स्टेशनवर मोठ्या प्रमाणावर जन आक्रोश मार्चा

प्रतिनिधी १ एप्रिल

**अकोट:** काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल हत्याकांड प्रकरणी इतर आरोपींना अटक करावी, तसेच अटकेत असलेला आरोपी उबेद पटेल राजीक उर्फ काले पटेल याची नार्को टेस्ट करावी आदी प्रमुख मागणीचे निवेदन स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आले. पटेल कुटुंब, काँग्रेस कमिटी व हितचिंतक गावकऱ्यांनी मंगळवारी रात्री एकत्र गोळा होत पोलीस स्टेशनला पंधरा हजार लोकांच्या सही असलेले निवेदन सादर केले.

सदर निवेदनामध्ये गुन्हा दाखल असलेल्या आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने



फेटाळले आहेत. ८५ दिवस उलटूनही आरोपींना अटक करण्यात आली नाही. त्यामुळे आरोपींना अटक करण्यात यावी तसेच आरोपींना फरार घोषित करून त्यांची मालमत्ता जप्त करावी यावे, आरोपी उबेद पटेल यांची नार्कोटेस्ट करण्यात यावी. तपास प्रगतीचा नियमित अहवाल देण्यात यावा अशा मागण्या करण्यात आले आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी या प्रकरणी लवकरात लवकर स्पष्ट भुमिका जाहीर करावी, या प्रकरणी कठोर कारवाई न झाल्यास व्यापक जन आंदोलन उभारण्यात येईल असे निवेदनात नमूद केले आहे. आकोट तालुक्यातील मोहाळा येथील मशिदीत हिदायत पटेल हे ६ जानेवारी रोजी दुपारी नमाज पठणाकरिता गेले होते. या ठिकाणी त्यांच्यावर खूनी हल्ला चढविण्यात आला. या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्याने उपचारादरम्यान त्यांचा ७ जानेवारी पहाटे मृत्यु झाला. याप्रकरणी मुख्य आरोपी उबेद पटेल राजीक उर्फ काले पटेल,

अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष काँग्रेसचे मो. बद्रूजम्मा, संजय बोडखे आणि राजीव बोचे, फाजील आसीफ खा, फारूख आसिफ खाँ यांच्या विरुध्द गुन्हे दाख करण्यात आले होते. दरम्यान उबेद पटेल याला अटक करण्यात आली आहे.

## अकोला जिल्ह्यातील ४३ खेळाडूंना शिष्यवृत्ती, २१ बॉक्सिंगपटूंची चमक

प्रतिनिधी १ एप्रिल

**अकोला:** राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यातील खेळाडूंना महाराष्ट्र शासनाकडून मोठा दिलासा मिळाला असून एकूण ४३ खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये विशेष म्हणजे २१ खेळाडू बॉक्सिंग या क्रीडा प्रकारातील असून जिल्ह्यातील बॉक्सिंग खेळाची वाढती ताकद अधोरेखित झाली आहे.ञ्

‘राष्ट्रीय स्तरावर सहभाग नोंदवून प्राविण्य मिळवणाऱ्या या खेळाडूंना आर्थिक सहाय्य मिळणार असल्याने त्यांच्या पुढील प्रशिक्षणास मोठी चालना मिळणार आहे.‘

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत गुणवंत खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. या योजनेत राष्ट्रीय स्तरावरील सहभाग व प्राविण्यानुसार(सुवर्ण पदक ११२५०, रजत पदक ८९५०, कांस्य पदक ६७५० तसेच सहभागी खेळाडूंना ३७५०) विविध रकमेची शिष्यवृत्ती दिली जाते, ज्यामुळे खेळाडूंच्या प्रशिक्षण, आहार व साहित्य खर्चास मदत होते. या यादीत विविध क्रीडा प्रकारांतील खेळाडूंचाही समावेश आहे. मात्र बॉक्सिंगमध्ये सर्वाधिक



२१ खेळाडूंनी शिष्यवृत्ती मिळवत आघाडी घेतली आहे.

पालक व प्रशिक्षकांनीही शासनाच्या या उपक्रमाचे स्वागत करत खेळाडूंना मिळणारे आर्थिक बळ अत्यंत महत्त्वाचे असल्याचे नमूद केले.

या शिष्यवृत्तीमुळे जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राला नवी उभारी मिळणार असून अधिकाधिक विद्यार्थी क्रीडा क्षेत्राकडे वळतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

जिल्हाधिकारी वर्षा मीना, जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट्ट यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## थोड्याशा पावसाने रस्त्यांची दुरावस्था

◆ नागरिकांचे हाल, तातडीने दुरुस्तीची मागणी

प्रतिनिधी १ एप्रिल

**अकोला:** अलीकडील हलक्या पावसामुळेच दिगंबर जी भिरड नगर राजू बाबा आश्रम, परिसरातील लेआउटमधील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याचे चित्र समोर आले आहे. गाड्या आणि सायकलींची ये-जा तर दूरच, पण पायदळ चालणे सुद्धा कठीण झाले असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.



दिगंबर जी भिरड नगर राजू बाबा आश्रम तसेच आसपासच्या भागात ये-जा करणाऱ्या नागरिकांना विशेष अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक वाहनधारकांना आपली वाहने राजू बाबा आश्रम परिसरात पार्क करावी लागत असून, पुढे पायी प्रवास करावा लागत आहे. स्थानिक रहिवासी एकमेकांना मदत करत असले तरी परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे.

विशेष म्हणजे, यापूर्वी रस्ता कच्चा असतानाही वाहतूक काही प्रमाणात सुरळीत होती. मात्र अलीकडे टाकण्यात आलेल्या गटारी पाईपलाईन कामानंतर रस्त्याची माती पूर्णपणे सैल व चिखलयुक्त झाली आहे. परिणामी, हलक्या पावसातही रस्ता चिखलमय होऊन चालण्यास अयोग्य ठरत आहे.

नागरिकांनी प्रशासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त करत, पावसाळ्यापूर्वी तातडीने रस्त्याचे मजबुतीकरण व दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. अन्यथा, येणाऱ्या पावसाळ्यात परिस्थिती अधिक गंभीर होऊन नागरिकांसह शाळकरी विद्यार्थ्यांनाही घराबाहेर पडणे कठीण होईल, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

स्थानिक नागरिकांनी नगरसेवकांनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रशासनाचे लक्ष वेधावे व त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी विनंती केली आहे.

## नगरपरिषदेने चार युवा पोलिसांचा केला सन्मान

प्रतिनिधी १ एप्रिल

**तेल्हारा :** शहरातील निलेश गावत्रे, सूरज ठाकूर, पूजा कावळे व कार्तिक खाडे या चार होतकरू विद्यार्थ्यांची अकोला पोलीस दलात निवड झाली. त्यांच्या यशाबद्दल तेल्हारा नगरपरिषदेच्या वतीने सत्कार करण्यात आला. नगराध्यक्ष वैशाली पालीवाल, उपाध्यक्ष सचिन तायडे, मुख्यधिकारी सतीश गावंडे व नगरसेवकांच्या उपस्थितीत शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान



करण्यात आला. प्रतिकूल परिस्थितीतून जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रमांच्या बळावर मिळवलेले हे यश तरुणांसाठी प्रेरणादायी ठरले असून, प्रामाणिकपणा व कर्तव्यभावनेने पोलीस सेवेत कार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

## लग्ना नंतरही जिद्द कायम ठेवून काजलने पोलिस भरतीत मिळविले यश

प्रतिनिधी १ एप्रिल

**मुर्तीजापुर:** स्वतःवर एक विश्वास राखून लग्ना नंतर जिद्द कायम ठेवून काजलने पोलीस भरतीमध्ये मिळविलेले यश इतर मुलीसाठी प्रेरणादायी ठरत आहे. खरंतर जीवनामध्ये काहीतरी करायचा आहे हा उद्देश समोर ठेवून लग्नाचे नंतर परिवाराची जबाबदारी सांभाळून काजल गोविंदा आजळकर यांनी पोलीस भरतीमध्ये यश मिळून गरुड झेप



घेतली आहे. काजलचे पती गोविंद आजळकर आणि सासू मीना आजळकर यांचा पूर्णपणे सहकार्य व मार्गदर्शन मिळाल्यामुळे स्वतःच्या जिद्दीने मेहनतीने २०२४ - २०२५ काजल शेवटी आपले स्वप्न पूर्ण केले आहे काजल आजळकर हिने अकोला पोलीस भरती मध्ये हा निवड झाली म्हणून नगरसेवक सचिन देशमुख यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन काजल चे स्वागत केले. यावेळी रवी माडकर, अन्वर खान, अमोल राऊत, मो. रिजवान सिद्दिकी , गोविंद आजळकर उपस्थित होते.

## अकोट तालुक्याला वादळी वारे गारपिटीने झोडपले

◆ गहू, कांदा, केळीचे झाले अतोनात नुकसान

प्रतिनिधी १ एप्रिल

**अकोट:** सोमवारी रात्री जिल्ह्यात वादळी वारे आणि गारपिटीने थैमान घातले. याचा फटका रब्बी पिकांना मोठ्या प्रमाणात बसला. अकोट तालुक्यातील अकोली जहागीर जवळील कापशी शिवारात गहू, कांदा आणि केळीचे अतोनात नुकसान झाले. तसेच कुटासा, चोहोट्टाबाजार भागातही नैसर्गिक आपत्तीचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो आहे.



सोमवारी रात्री साडेआठच्या सुमारास जोरदार पाऊस व वारा यामध्ये गहू केळीचे अतोनात नुकसान झाले. गारांचा पाऊस पडल्याने गहू झोपला. अकोली जहागीर परिसरातील रामेश्वर जायले यांचे कांदा गहू पीक जमिनीवर झोपले. अस्मानी संकटाचा सामना शेतकरी करीत आहेत. झालेली नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकरी करीत आहेत. वारंवार होत असलेल्या नुकसानामुळे शेतकरी अक्षरशः मेटाकुटीला आले आहे. सोमवारी रात्री जिल्ह्यात वादळी वारे आणि गारपिटीने थैमान घातले. याचा फटका रब्बी पिकांना मोठ्या प्रमाणात चांगलाच बसला. अकोट तालुक्यातील अकोली जहागीर जवळील कापशी शिवारात गहू, कांदा आणि केळीचे अतोनात नुकसान झाले. तसेच कुटासा, चोहोट्टाबाजार भागातही नैसर्गिक आपत्तीचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. १ एप्रिल २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# चातारी घाटावर रेती तस्करीचा उन्माद; राजकीय दबावामुळे पोलिसांची माघार

प्रतिनिधी १ एप्रिल

**उमरखेड :** पैनगंगा नदीपात्रातील चातारी शिवारात सुरू असलेल्या अवैध रेती उत्खननावर कारवाईसाठी गेलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला राजकीय दबावामुळे माघार घ्यावी लागल्याची घटना समोर आली आहे.

या प्रकारामुळे महसूल व पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, ३० मार्च रोजी सायंकाळी चातारी परिसरात अवैध रेती उत्खनन सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर यवतमाळ एलसीबी (पुसद कॅम्प) पथकाने घटनास्थळी धाव घेतली. तेथे ५ ते ६ ट्रॅक्टरद्वारे रेतीची वाहतूक सुरू असल्याचे आढळून आले. पोलिसांनी ही वाहने ताब्यात घेण्याची तयारी सुरू केली असताना संबंधित तस्करांनी एका स्थानिक लोकप्रतिनिधीच्या पुत्राला घटनास्थळी बोलावल्याची माहिती आहे.

यानंतर मोठ्या संख्येने जमाव घटनास्थळी जमला. सुमारे ३०० ते ४०० लोकांच्या उपस्थितीत पोलिसांना दमदाटी करण्यात आल्याचा आरोप आहे. यावेळी संबंधित ट्रॅक्टर मराठवाडा हद्दीतील दिघी शिवारात हलविण्यात आल्याचे सांगितले जाते. परिस्थिती तणावपूर्ण बनल्याने पोलिसांना कारवाई न करता माघार घ्यावी लागली.

या संपूर्ण प्रकारादरम्यान महसूल विभागाचे स्थानिक अधिकारी उपस्थित असूनही त्यांनी कोणतीही ठोस भूमिका घेतली नसल्याची चर्चा आहे. वरिष्ठ स्तरावरही या घटनेकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप स्थानिक स्तरावरून व्यक्त होत आहे.

विदर्भ व मराठवाडा सीमेवरील पैनगंगा नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध रेती उत्खननाचा प्रश्न यामुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे.

सर्वसामान्यांवर कठोर कारवाई करणाऱ्या यंत्रणांना राजकीय दबावामुळे माघार घ्यावी लागल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

# वाहन चोरट्यास अटक; तीन वाहने जप्त

प्रतिनिधी १ एप्रिल



**यवतमाळ :** जिल्ह्यात वाढत्या वाहनचोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी विशेष मोहीम राबवत मोठी कारवाई केली असून तीन चोरीची वाहने जप्त करण्यात आली आहेत. या प्रकरणी एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

मयंक सुभाष पाईकराव (रा. मुलकी जांब रोड, यवतमाळ) असे आरोपीचे नाव आहे.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या आदेशानुसार, तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेने ही कारवाई केली. प्रवासवन परिसरात एक संशयित व्यक्ती चोरीचे वाहन विक्रीसाठी फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार मयंक सुभाष पाईकराव (रा. मुलकी जांब रोड, यवतमाळ) याला ताब्यात घेण्यात आले.

सखोल चौकशीत आरोपीने आपल्या साथीदारांसह वाहनचोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी आर्णी रोड परिसरातून चोरीस गेलेली ओमनीसह इतर वाहने जप्त केली. आरोपीकडून एकूण तीन वाहने हस्तगत करण्यात आली असून त्यामध्ये ओमनी (अंदाजे किंमत 50,000), स्प्लेंडर दुचाकी (20,000) आणि ज्युपिटर दुचाकी (40,000) यांचा समावेश आहे. एकूण जप्त मालमत्तेची किंमत सुमारे 1.10 लाख आहे.

ही कारवाई गुन्हे प्रकटीकरण शाखा, अवधूतवाडी येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत जिंदमवार, पोलीस उपनिरीक्षक सुरज जगताप, एएसआय सुरेश मेश्राम, पोलीस हवालदार विशाल भगत, बलराम शुक्ला, पोलीस नाईक रुपेश ढोबळे, पोलीस शिपाई मोहम्मद भगतवाले, योगेश चोपडे, सचिन राठोड, नितीन कवडे, पोलीस शिपाई राम कांबळे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

या कारवाईमुळे जिल्ह्यातील वाहनचोरीच्या घटनांवर आळा बसण्यास मदत होणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

# बंदी भागातील रस्त्यांची दुरवस्था; नागरिकांची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

प्रतिनिधी १ एप्रिल



**उमरखेड :** तालुक्यातील अतिदुर्गम बंदी भागातील सोनदाभी ते बोरी वनमार्गाची अवस्था अत्यंत दयनीय बनली असून नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. मूलभूत सुविधांच्या अभावामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी होत आहे.

माहितीनुसार, सन २०२५ मध्ये बोरी ते सोनदाभी दरम्यान खडीकरणाचे काम करण्यात आले होते. मात्र हे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. परिणामी, रस्ता पूर्णपणे उखडला असून वाहन चालवणे तर दूरच, पायी चालणेही अवघड झाले आहे. त्यामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. पूर्वी वनविभागाच्या परवानगीअभावी रस्त्यांची कामे रखडली होती. मात्र परवानगी मिळाल्यानंतरही सध्या सुरू असलेल्या कामांच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. यामुळे प्रशासनाने कामांवर कडक देखरेख ठेवावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे. या भागात आदिवासी, बंजारा व इतर समाज मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असून त्यांचे जीवनमान अत्यंत कठीण आहे. शेतकऱ्यांचे फोडपट्टे अद्याप प्रलंबित असून समाधान शिबिरांमधूनही अपेक्षित दिलासा मिळालेला नसल्याची तक्रार आहे. दरम्यान, मानव विकास मिशन अंतर्गत २०२१-२२ मध्ये सोनदाभी येथे मंजूर करण्यात आलेला महिलांसाठीचा वनउपज प्रक्रिया उद्योगही अद्याप सुरू होऊ शकलेला नाही. इमारत पूर्ण असूनही आवश्यक यंत्रसामग्रीच्या अभावामुळे प्रकल्प रखडला आहे, त्यामुळे महिलांच्या रोजगाराच्या संधीही मर्यादित राहिल्या आहेत. या सर्व समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देत जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून रस्त्यांची दुरुस्ती तसेच प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत, अशी कळकळीची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# अवकाळी पावसाचा तडाखा; पिकांचे नुकसान

## शेतकरी आर्थिक संकटात; मदतीची मागणी

प्रतिनिधी १ एप्रिल



**महागाव :** तालुक्यात अचानक कोसळलेल्या अवकाळी मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून त्यांच्या आर्थिक अडचणींमध्ये भर पडली आहे. सुमारे पाच तास सुरू राहिलेल्या पावसामुळे हरभरा, गहू, ज्वारी, तिळ तसेच उन्हाळी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

सायंकाळी अचानक बदललेल्या हवामानामुळे सुरू झालेल्या पावसाने शेतकऱ्यांना सावरण्याची संधीच मिळाली नाही. काढणीस आलेले हरभरा व गहू अनेक ठिकाणी शेतातच वाळवण्यासाठी ठेवले होते, तर काही भागात कापणी अंतिम टप्प्यात होती. मुसळधार पावसामुळे ही पिके पूर्णतः भिजून निकामी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे.

जोरदार वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे उभ्या ज्वारी व तिळ पिकांनाही फटका बसला आहे. काही ठिकाणी पिके आडवी पडल्याने नुकसान अधिक वाढले आहे. वर्षभर कष्ट करून उभे केलेले पीक काही तासांत उद्ध्वस्त झाल्याने शेतकरी हताश झाले आहेत.

वाढते उत्पादनखर्च, कर्जाचा बोजा आणि बाजारभावातील अनिश्चितता यामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी हा अवकाळी पाऊस दुहेरी संकट ठरला आहे. हातात येणारे उत्पन्न डोळ्यासमोर वाहून गेल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

दरम्यान, नुकसानग्रस्त भागांचा तात्काळ पंचनामा करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी होत आहे. महसूल व कृषी विभागाने तत्काळ पाहणी करून मदतीची प्रक्रिया गतीने राबवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

अस्मानी संकटांचा वाढता धोका लक्षात घेता शेती व्यवस्थापनात बदल, हवामान अंदाजाचा प्रभावी वापर आणि पीकविमा योजनांचा लाभ घेण्याची गरज तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. मात्र, सध्या महागाव परिसरातील शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत आहेत.

# उमरखेडमध्ये महावीर जयंती उत्साहात; शोभायात्रेने वेधले लक्ष

प्रतिनिधी १ एप्रिल



**उमरखेड :** भगवान महावीर जयंती निमित्त शहरात सोमवारी भक्तीमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शहरातील मुख्य जैन मंदिरातून सकाळी शोभायात्रेला प्रारंभ झाला. आकर्षक सजावट, धार्मिक फलक आणि 'भगवान महावीर की जय'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. या यात्रेत जैन बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

शोभायात्रा जैन मंदिर, गणपती मंदिर, नागचौक, बसस्थानक, माहेश्वरी चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे खडकपुरा, तीनदेऊळ मार्ग व सराफा लाईनपर्यंत फिरून पुन्हा मंदिरात दाखल झाली. मार्गातील विविध ठिकाणी नागरिकांनी रांगोळ्या काढून तसेच पुष्पवृष्टी करून यात्रेचे स्वागत केले.

यात्रेच्या सांगता प्रसंगी जैन मंदिरात महाआरतीसह धार्मिक कार्यक्रम पार पडले.

महावीर जयंतीनिमित्त शहरभर दिवसभर भक्तीमय व उत्साही वातावरण अनुभवायला मिळाले.

# 43 चिमुकल्या रोजेदारांचा सन्मान

प्रतिनिधी १ एप्रिल



**फुलसावंगी :** मुस्लीम समाजाचा पवित्र रमजान महिना नुकताच पार पडला असून, या पार्श्वभूमीवर जिया मेमोरियल ट्रस्टच्या वतीने चिमुकल्या रोजेदारांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. १३ वर्षांखालील बालकांनी रमजान महिन्यात नियमितपणे रोजे पूर्ण केल्या आणि तब्बल ४३ चिमुकल्यांचा सन्मान प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला.

रोजा इस्लाम धर्मातील पाच प्रमुख कर्तव्यांपैकी एक महत्त्वाचा स्तंभ असून प्रौढांसाठी अनिवार्य आहे. लहान मुले, आजारी व्यक्ती आणि काही विशिष्ट परिस्थितीत असलेल्या महिलांना त्यात सूट दिली जाते. तरीही, लहान वयात धार्मिक संस्कार, शिस्त आणि आत्मसंयमाची जाणीव निर्माण व्हावी, या हेतूने अनेक बालक स्वेच्छेने रोजा पाळतात.

जिया मेमोरियल ट्रस्टने गेल्या तीन वर्षांपासून हा अभिनव उपक्रम सुरू केला असून यंदा ४३ बालकांनी संपूर्ण रमजान महिन्यात रोजा पाळून आदर्श निर्माण केला. या चिमुकल्यांचा सन्मान फुलसावंगी येथील जामा मस्जिदमध्ये आयोजित कार्यक्रमात करण्यात आला.

सोहळ्यात पालक, स्थानिक नागरिक आणि समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ नागरिक शमिमोदिन नवाब यांनी भूषविले, तर कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन जिया मेमोरियल ट्रस्टचे अध्यक्ष मौलाना मुसद्दीक यांनी केले.

# दराटी पोलीस ठाण्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

प्रतिनिधी १ एप्रिल



**यवतमाळ :** उमरखेड तालुक्यातील अतिदुर्गम भागातील दराटी पोलीस ठाण्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. ठाणेदार प्रसेनजित जाधव यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

आगामी सण-उत्सव तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीच्या औचित्य साधून या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी परिसरातील शासकीय व खाजगी क्षेत्रात निवड झालेल्या तसेच शैक्षणिक क्षेत्रात यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये ग्राम घमापुर येथील पत्रकार नंदकिशोर जाधव यांचे सुपुत्र डॉ. गोपाल जाधव यांनी फिजिओथेरपी पदवी प्राप्त केली, तर ग्राम अमडापुर येथील कैलास झामरे यांचे सुपुत्र सुरज झामरे यांनी एमबीबीएस पदवी मिळवली. तसेच दराटी येथील कु. सोनुताई जाधव हिची गोंदिया जिल्ह्यात, तर सेवालालनगर येथील कु. पुनमताई आडे हिची जळगाव जिल्ह्यात निवड झाली आहे.

याशिवाय अमडापुर येथील अमोल झामरे यांच्या संकल्पनेतून चालविण्यात येणाऱ्या योगा व ट्युशन क्लासमधील विद्यार्थ्यांनीही यश मिळवले. ११ ते १६ वयोगटात अनिकेत ओमप्रकाश फोले प्रथम, तर ६ ते ११ वयोगटात कु. श्रद्धा नितीन दुमारे प्रथम आली.

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व मार्गदर्शक शिक्षकांना दिले.

कार्यक्रमाचे आयोजन सहायक पोलीस उपनिरीक्षक धोंडबा खोकले, पोलीस हवालदार गजानन डोंगरे, पोलीस अंमलदार रवि जाधव, सिद्धार्थ कांबळे, अमोल गंगरपाड व अश्विनी शिंदे यांनी केले. कार्यक्रमाला पोलीस पाटील तसेच परिसरातील ग्रामस्थ अंकुश राठोड, युवराज राठोड, नंदकिशोर जाधव, विठ्ठल मुडे, अविनाश जाधव, संतोष जाधव, प्रविण मुनेश्वर, गोलु मुनेश्वर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पोलीस अंमलदार रवि जाधव यांनी केले. या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

# ५ एप्रिलला बौद्ध धम्मीय उपवर-वधू परिचय मेळावा

प्रतिनिधी १ एप्रिल

**यवतमाळ :** बौद्ध मनोमीलन परिणय ग्रुप, नागपूर आणि डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने बौद्ध धम्मीय उपवर-वधू परिचय मेळावा रविवारी (दि. ५) आयोजित करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मास्टर कॉलनी, सावंगी रोड, वर्धा येथे सकाळी १० वाजता मेळाव्याला सुरुवात होईल. निःशुल्क असलेल्या या मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक विवेक मेश्राम, पंढरीनाथ आडे, निशा राऊत यांनी केले आहे.

# मार्च एंडिंगच्या धावपळीत सा.बां.उपविभागात ठेकेदारांची गर्दी; बिल मंजुरीवर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी १ एप्रिल

> ■ तालुक्यात मागील वर्षभरात रस्ते, नाली तसेच सिमेंट रस्त्यांची विविध कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हाती घेण्यात आली होती. या कामांची बिले आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी मंजूर करून घेण्यासाठी ठेकेदारांकडून मोठी धडपड सुरू असल्याचे चित्र आहे. निधी खर्च झाल्याचे दाखविण्याच्या घाईत काही ठिकाणी अपूर्ण कामांचीही बिले काढली जात असल्याचा आरोप केला जात आहे.

**उमरखेड :** आर्थिक वर्षअखेरच्या 'मार्च एंडिंग'च्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयात ठेकेदारांची मोठी गर्दी होत असून, प्रलंबित व अपूर्ण कामांच्या बिलांच्या मंजुरीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या प्रक्रियेत अनियमिततेच्या चर्चांनाही उधाण आले आहे.

उपविभागीय कार्यालयात ठेकेदारांची वाढती वर्दळ आणि अधिकाऱ्यांशी सुरू असलेल्या बैठका यामुळे या प्रक्रियेची पारदर्शकता संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. काही ठेकेदारांकडून अधिकाऱ्यांना आमिष दाखविल्याच्या चर्चाही स्थानिक पातळीवर रंगू लागल्या आहेत.

दरम्यान, २८ मार्च रोजी दुपारी उपविभागीय अभियंत्यांच्या दालनात ठेकेदारांची बैठक झाल्याचे समजते. या बैठकीत आर्थिक व्यवहारांबाबत चर्चा झाल्याचा आरोप करण्यात येत असला तरी संबंधित अधिकाऱ्यांकडून स्पष्ट प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही. संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता अधिकाऱ्यांनी प्रतिसाद दिला नसल्याचेही सांगण्यात येते.

दरम्यान, या संदर्भात ठेकेदार अनिल डाखोरे यांनी, "आम्ही काही ठेकेदार उपविभागीय अभियंत्यांच्या दालनात उपस्थित होतो; मात्र तेथे सर्वेयर येण्याबाबत चर्चा सुरू होती. माझी मोठी बिले प्रलंबित असली तरी निधीअभावी ती मंजूर झालेली नाहीत," असे स्पष्टीकरण दिले.

एकूणच 'मार्च एंडिंग'च्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या बिल मंजुरी प्रक्रियेची पारदर्शकता व निकष याबाबत प्रशासनाने स्पष्टता देण्याची गरज व्यक्त होत आहे.

# 'शिवमहापुराण' निमित्त मोफत जलसेवा

प्रतिनिधी १ एप्रिल



**आर्णी :** शहरात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या 'शिवमहापुराण' कथेमुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथावाचक पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या उपस्थितीत सुरू असलेल्या या महाकथेचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित राहत आहेत.

३० मार्च ते ५ एप्रिलदरम्यान हा धार्मिक सोहळा पार पडत असून, श्री बहिरमदेव शिव महापुराण सेवा समिती ट्रस्टच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढाकार घेत शिवभक्तांसाठी मोफत पाणपोई (जलसेवा) सुरू केली आहे. रोहन जयस्वाल, अनिल सुकले, नयन जयस्वाल, गजू मोरलेवार, उमेश राठोड, राजू जयस्वाल (मामा), गोविंद बिसमोरे आणि यश बगडाई यांनी हा उपक्रम राबवला आहे.

उन्हाळ्याच्या वाढत्या तीव्रतेत ही जलसेवा भाविकांसाठी दिलासा देणारी ठरत असून, या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# सिटी न्यूज अमरावती

बुधवार, दि. १ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## ॲड. दिलीप एडतकर यांचा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सरचिटणीस पदाचा राजीनामा

**अमरावती :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस व धनगर समाजाचे नेते ॲड. दिलीप एडतकर यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला असून तशा अर्थाचा ई-मेल प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला, वरिष्ठ नेत्या यशोमती ठाकूर व वरिष्ठ नेते डॉ. सुनील भाऊ देशमुख यांना पाठविला आहे. राजीनामा पत्रात ॲड. एडतकर म्हणतात, आपण मला मी न मागता प्रदेश काँग्रेस सरचिटणीस पदाची जबाबदारी दिली होती. त्याबद्दल मी आपला शतशः आभारी



आहे. माझ्या परीने मी ती इमाने इतबारे पार पाडली आहे. तथापि यापुढे प्रदेश काँग्रेस सरचिटणीस या नाममात्र पदाला चिकटून राहणे मला शक्य नाही.त्यांनी प्रदेश सरचिटणीस पदाचा राजीनामा स्वीकारावा ही नम्र विनंती.

## भगवान महावीरांची शिकवण आंतरिक सुंदरता, सद्भाव व सकारात्मक दृष्टिकोन देणारी - आमदार सुलभा खोडके

### ♦ त्रिकाल वंदनीय भगवान महावीरांचा जन्म कल्याण सोहळा उत्साहात साजरा

प्रतिनिधी १ एप्रिल

**अमरावती:** भगवान महावीरांचा जन्म कल्याणक सोहळा तिथीनुसार चैत्र शुद्ध त्रयोदशीला साजरा होतो. इ. स. ५९९ पूर्वी राजा सिद्धार्थ आणि माता त्रिशला यांच्या संसारवेलीवर तीर्थकर प्रकृतीचे एक फुल उमलले. 'मनुष्य जन्माने नव्हे तर कर्माने महान होतो' हे भगवान महावीरांच्या जीवन दर्शनातून पाहायला मिळते. अमरावती येथे मंगळवार दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी भगवान महावीरांचा जन्म कल्याणक सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा चोरडिया परिवाराच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याच श्रृंखलेत अमरावती शहर स्थित जयस्तंभ चौक परिसरात पिताश्री स्वर्गीय पारसमलजी व मातोश्री स्वर्गीय पद्माबाई चोरडिया यांच्या स्मृतीप्रित्यर्थ महावीर पाणपोई स्थापित करण्यात आली. मंगळवारी आमदार सुलभा संजय खोडके यांच्या हस्ते महावीर पानपोई चे उदघाटन करण्यात आले. सर्वप्रथम आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांनी समस्त विश्वाला कठोरपणा सोडून जगाला अहिंसा, करुणेचा मार्ग दाखविणाऱ्या भगवान महावीर



यांच्या प्रतिमेस पूजन - वंदन - नमन व माल्यार्पण करीत यावेळी त्यांनी भगवान महावीर यांच्या चरणी विश्वशांती व विश्वकल्याणाची प्रार्थना केली. यादरम्यान सौ. अनिताताई नवीन चोरडिया व नवीनबाबू चोरडिया यांच्या हस्ते आमदार सुलभा खोडके यांचा जैन दुपट्टा देऊन स्नेहपूर्ण सत्कार करण्यात आला.मानवजातीच्या इतिहासात काही व्यक्तिमत्वे अशी असतात की ज्यांनी आपल्या विचारांनी, तत्वज्ञानाने आणि आचरणाने संपूर्ण मानवजातीला एक नवी दिशा दिली. अशा तेजस्वी आणि कालातीत व्यक्तिमत्वानमध्ये भगवान महावीर यांचे स्थान अत्यंत उंच आहे. चैत्र महिन्यात साजरी होणारी भगवान महावीर जयंती ही केवळ धार्मिक उत्सव नसून ती मानवी मूल्यांचा जागर आणि नैतिकतेचा मार्ग दाखवणारी एक महत्वपूर्ण पर्वणी आहे. आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनात भगवान महावीरांचे विचार अधिकच सुसंगत आणि आवश्यक वाटतात.सत्य बाब अनेक पैलुंनी पडताळणी करावी, आपलेच विचार म्हणजे सत्यता हा अट्टाहास न धरता दुसऱ्यांच्या विचारांचा सन्मान राखला जावा, दुसऱ्यांच्या विचारांचे महत्व समजावून घ्यावे, सत्याची पडताळणी करावी. एक दुसऱ्याकरिता उत्कृष्ट विश्व निर्माण करू शकतो, हा त्यांच्या शिकवणीतील आशय महत्वाचा आहे. सर्व जीवितांनी एक दुसऱ्याच्या सहयोगाने एक दुसऱ्यांकडून शिकावे व समोर जावे. सर्व जीवितांची क्षमा मागावी व सर्वांनाच क्षमा करावी. स्वस्थ जीवनशैलीसाठी शाकाहारी बनावे. युवा पिढीने भगवान महावीरांच्या अहिंसा तत्वाचे व आधारभूत मूल्यांचे अनुसरण केले तर ते अधिक उत्तमरित्या निर्भयपणे साऱ्या विश्वात आपले कर्तृत्व गाजवू शकतील, असा विश्वास वाटतो. भगवान महावीरांची शिकवण आंतरिक सुंदरता, सदभाव व सकारात्मक दृष्टिकोन देणारी आहे. असे प्रतिपादन करीत आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांनी भगवान महावीरांचा जन्म कल्याणक सोहळा निमित्त सर्व उपस्थितांना शुभेच्छा दिल्यात. याप्रसंगी विनोद सामरा, नवीन चोरडिया, गगन चोरडिया, कोमल बोथरा, भरत खजांची, विजय बोथरा, विजय बुच्चा, राजेंद्रजी बुच्चा, पवन गट्टाणी, ओजस चोरडिया, प्रफुल्ल सावला, प्रवीण चोरडिया, नगीनचंदजी बुच्चा, विनोद राठी, उमेश बोरखडे, अमृत मुथा, सुधीरभाई शाह,दिपक डाबी आदिसह आमंत्रित सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाअंती सर्व उपस्थितांचे अनिता नवीन चोरडिया यांनी आभार मानले.

## शेतकऱ्याच्या कांदा विक्रीचे पैसे डिक्कीतून लंपास; चोरटा गुन्हे शाखेच्या ताब्यात

प्रतिनिधी १ एप्रिल

**अमरावती:** शेतकऱ्याच्या कांदा विक्रीचा पैसा दुचाकी वाहनाच्या डिक्की मधुन चोरी करणारा अय्याश चौरटा गुन्हे शाखेच्या ताब्यात घेण्यात यश आले आहे.

३१-०३-२०२६ रोजी पोलीस ठाणे गाडगे नगर अमरावती शहर येथे दाखल अपराध क्रमांक ३०३/२०२६ कलम ३०३ (२) ेए चा गुन्हा दाखल असुन, फिर्यादी यांचे वडील अंजनगाव सुर्जी येथे राहणारे असुन त्यांचे शेतातील कांदा विक्रीचे २०००००/- रु त्यांनी फिर्यादीला SBI शाखा राठी नगर येथे भरण्यासाठी दिले असता फिर्यादीने सदर रोख त्यांचे दुचाकीच्या डिक्कीमध्ये ठेवुन सदर गाडी एँघ् शाखा राठी नगर येथे उभी करुन बँके मध्ये गर्दी आहे का हे पाहण्यासाठी गेले असता अज्ञात आरोपीने त्यांचे वर पाळत ठेवुन त्यांचे दुचाकीचे डिक्कीमधुन पैसे चोरल्या बाबत पोलीस ठाणे गाडगे नगर अमरावती येथे गुन्हा दाखल आहे. गुन्हे शाखेचे पथक सातत्याने



गुन्हा घडला तेव्हा पासुन समांतर तपास करीत असता, आरोपीच्या येण्या जाण्याच्या मार्गाचा तांत्रीक उपकरणाचा वापर करुन तपास केला असता आरोपी ने गुन्हा करते वेळी बुलेट गाडीचा वापर केल्याचे दिसुन आले. सदर गुन्ह्याचा सातत्याने तपास केला असता आज दिनांक ३१.०३.२०२६ रोजी आरोपीला त्याचे मनकर्णा नगर येथील राहते घरुन ताब्यात घेतले सदर गुन्ह्यांसंबंधाने त्याचे कडे प्राथमिक तपास केला असता त्यांने सदर गुन्हा केल्याचे तपास निष्पन्न झाले. आरोपी शंतनु गजानन पटोळे वय २२ वर्ष रा. मनकर्णा नगर अमरावती जप्त मुद्देमाल नगदी २,००,०००/- रु, गुन्ह्यात वापरलेली रॉयल ईन्फिल्ड बुलेट ३५० गाडी क्र. Mhed-27-EE-6216 किमांत अंदाजे २,१५,०००/- रु, Iphone १३ कंपनीचा मोबाईल फोन IMEI no.50920437859569, 350920437345908 किमंत अंदाजे ३००००/- रु असा एकुण ४,४५,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी कडे प्राथमिक तपास केला असता त्याने अमरावती शहरात ब-याच ठिकाणी अशाच प्रकारे गुन्हे केले असुन त्याचे कडे अधिक तपास करुन गुन्हे उघड होण्याची दाट शक्यता आहे. सदर आरोपी विरुध्द यापुर्वी अनेक प्रकारचे गुन्हे नोंद आहे. आरोपाची गुन्हा करण्याची पद्धत : आरोपी हा गर्दीच्या ठिकाणी तसेच बँकेसमोर लोकावर पाळत ठेवुन मोपेड दुचाकीच्या डिक्कीमध्ये पैसे ठेवलेला वाहनांना हेरुन त्यातील रोख रक्कम चोरण्याच्या सवईचा सराईत गुन्हेगार आहे.

## वादळासह अवकाळी, गारपिटीने ६०० हेक्टरमधील पिके बाधित

### ♦ अंजनगाव, चांदूर बाजार तालुक्यात गहू, कांदा, केळी, संत्रा पिकांचे नुकसान

प्रतिनिधी १ एप्रिल

**अमरावती :** जिल्ह्यात २४ तासांत झालेल्या वादळासह अवकाळी पावसाने ५७८.८६ हेक्टर्समधील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. यामध्ये प्रामुख्याने अंजनगाव सुर्जी व चांदूरबाजार तालुक्यात गहू, कांदा, केळी व संत्राचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी अडचणीत आले आहे.

कृषी विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेद्वारा अवकाळी पावसाने बाधित पिकांचा प्राथमिक अहवाल विभागीय कृषी सहसंचालक, जिल्हा प्रशासनाला सादर केला. त्यानुसार सर्वाधिक ३१७.८० हेक्टरमध्ये अंजनगाव सुर्जी, २२७.७० हेक्टरमध्ये चांदूरबाजार, १८ हेक्टर अचलपूर, ८ हेक्टर भातकुली, ४

**अवकाळीने पीकनिहाय नुकसान**

कृषी विभागाचे प्राथमिक अहवालानुसार गव्हाचे १६० हेक्टर, हरभरा ७ हेक्टर, ज्वारी ४ हेक्टर, कांदा १५१.३६ हेक्टर, लिंबू २९.८० हेक्टर, भाजीपाला ८.१० हेक्टर, केळी ६० हेक्टर, संत्रा १३३.६० हेक्टर, आंबा २ हेक्टर, पपई १२ हेक्टर व इतर पिकांचे ११ असे एकूण ५७८.८६ हेक्टर्समधील पिके बाधित झाली आहेत. हेक्टरमध्ये दर्यापूर तालुक्यात नुकसान झालेले आहे.

जिल्ह्यात दोन दिवसांपासून दिवस कमालीचे उष्ण होते. कमाल तापमान ४१.४ अंशांवर गेले आहे. शिवाय अंशतः ढगाळ वातावरणही आहे. त्यातच वादळासह अवकाळी व तुरळक ठिकाणी गारपीट झाल्याने पिकांचे नुकसान झाले आहे. जिल्ह्यात २ एप्रिलपर्यंत काही ठिकाणी अवकाळी पाऊस होणार असल्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

## भारत भूषण पुरस्काराने विहिगावचा सुपुत्र सोहम मोहन नेसनेसकर सन्मानित

प्रतिनिधी १ एप्रिल

**अमरावती :** विहिगाव चा सुपुत्र व ओम इंटरनॅशनल स्कूल अंजनगाव सुर्जी येथील इय्यता पहिलीचा विद्यार्थी सोहम मोहन नेसनेसकर ला जून २०२५ मध्ये वियेतनाम येथे झालेल्या इंटरनॅशनल योगा कंपेटिशन मध्ये जपान. मलेशिया. वियेतनाम च्या स्पर्धाकांना मात दिली व भारतात करिता सुवर्ण पदक प्राप्त केले.

त्या बद्दल त्याला महाराष्ट्राचे शिक्षण मंत्री दादाजी भुसे सहेब यांच्या हस्ते २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी अमरावती ला



सन्मानपत्र मेडल सन्मानचिन्हे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आले. महाराष्ट्र गौरव राज्यस्तरीय पुरस्कार. राष्ट्र गौरव राज्यस्तरीय पुरस्कार. क्रीडा शिरोमणी राष्ट्रीय पुरस्कार.

अशे १४ प्रकारचे राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरीय पुरस्कार मिळाले याची दखल घेत ॲंटी हिरमण फाउंडेशन व नीती आयोग (सेंट्रल गवरमेंट ऑफ इंडिया) च्या माध्यमातून उदयपूर येथे पंचतारंकित हाटेल मेरिटयल मध्ये

२७/०३/२०२६ ला सोहम मोहन नेसनेसकर यास भारत भूषण पुरस्कारने एन के सिंग इंडियन आर्मी ऑफिसर प्रशांत अग्रवाल अध्यक्ष नारायण सेवा संस्था उदयापूर शुभम चौरेसिया अध्यक्ष ॲंटी हिरमन फाउंडेशन उदयपूर याच्या हस्ते सन्मानपत्र आकर्षक भव्य सन्मानचिन्ह गोल्ड मेडल देऊन गौरव करण्यात आला.

## माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश साबळे यांच्या सेवा कार्याचा गौरव व सत्कार

प्रतिनिधी १ एप्रिल

**अमरावती:** संत गाडगे बाबा यांच्या कार्याचा सुगंध आजही या मातीत दरवळत आहे. त्यांच्या विचारांची दशसूत्री आणि सेवाभावी वृत्ती हाच मानवी जीवनाचा खरा आधार असल्याचे प्रतिपादन भारतीय प्रशासकीय सेवेतील माजी विशेष सचिव अनिल जोशी यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात दिनांक २५ मार्च २०२६ रोजी श्रीकांत मेमोरियल हॉल येथे 'संत गाडगे बाबांची दशसूत्री आणि सेवाभावी संस्थांची भूमिका' आणि सेवाभावी व्यक्तिमत्व यांचा गौरव सोहळा या विषयावर आयोजित विशेष कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून अनिल जोशी हे होते. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.व्ही.एम. मेटकर, श्री संत गाडगे बाबा अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे , महाराष्ट्र राज्य सरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री गजाननराव बोंडे हे उपस्थित होते. याप्रसंगी संत गाडगे बाबांच्या विचार व कार्यानुसार कार्य करणारे सेवाभावी व्यक्तिमत्व श्री प्रकाश दादा साबळे यांचा प्र. कुलगुरू श्री महेंद्र ढोरे, भारत सरकारचे सेवानिवृत्त विशेष सचिव अनिल जोशी व मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

## खजिना' रिकामाच ! मालमत्ता कर वसुली २५ टक्क्यांवरच अडकली

### ♦ मोठा फौजफाटा असूनही मोहीम 'थंडावली' ; कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी १ एप्रिल

**अमरावती :** शहराच्या विकासाचा कणा असलेल्या अमरावती महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सध्या अत्यंत विदारक बनली आहे. आर्थिक वर्ष संपत आले असतानाही मालमत्ता कराची वसुली अवघ्या २५ टक्क्यांवर येऊन थांबली आहे. आतापर्यंत ६६ कोटी ५४ लाख ४३ हजार ५४६ रुपयांची वसुली झाली असली तरी, तब्बल १८५ कोटी ८१ लाख ६२ हजार ६९१ रुपयांची थकबाकी अद्यापही वसूल झालेली नाही. महापालिकेकडे वसुलीसाठी कर्मचाऱ्यांचा मोठा फौजफाटा असतानाही ही वसुली मंदावल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**आर्थिक गाडा रुतला !**

महापालिकेचा दैनंदिन खर्च, कर्मचाऱ्यांचे पगार आणि विकासकामे ही सर्वस्वी करवसुलीवर अवलंबून असतात. आधीच प्रशासकीय काळात झालेल्या कामांच्या चौकशीचे वादळ घोंगावत असताना, आता 'रिकाम्या तिजोरी'मुळे महापालिकेचा गाडा कसा चालणार? असा सवाल उपस्थित होत आहे.

**मोठी कारवाई होणार का?**

थकीत करवसुलीसाठी आता महापालिका प्रशासन जप्ती किंवा नळ कनेक्शन कापण्यासारखी कठोर पावले उचलणार का? की केवळ नोटीस बजावण्यातच महापालिका प्रशासन वेळ घालवणार, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

**वसुलीचे 'रिपोर्ट कार्ड' काय सांगते ?**

एकूण मालमत्ता : ३ लाख ५ हजार ६९० आतापर्यंत झालेली वसुली : ६६ कोटी ५४ लाख ४३ हजार ५४६ रुपये

**टक्केवारी : अवघी २५ टक्के**

थकीत रक्कम : १८५ कोटी ८१ लाख ६२ हजार ६९१ रुपये (अंदाजे) चालू मागणी : ८३ कोटी १ लाख ५९ हजार

**प्रशासनाचा 'फौजफाटा' नेमका करतोय काय ?**

महापालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत हा मालमत्ता कर आहे. वेळेवर कर जमा झाला तरच शहरात रस्ते, पाणी आणि स्वच्छतेची कामे मार्गी लागतात. मात्र, मार्च महिना संपला तरी वसुलीचा आकडा पुढे सरकायला तयार नाही. विशेष म्हणजे, वसुलीसाठी प्रत्येक झोनमध्ये विशेष पथके असतानाही वसुलीची ही 'कासवगती' मानली जात आहे.

## जागतिक जलदिनानिमित्त अमरावतीत जलदिंडी व व्याख्यानाचे आयोजन

प्रतिनिधी १ एप्रिल

**अमरावती:** जागतिक जलदिनानिमित्त इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन अमरावती केंद्र, दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) अमरावती केंद्र, जलसंपदा विभाग आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये जलदिंडी व ठपाणी आणि समानताठ या विषयावरील व्याख्यानाचा समावेश होता.

सकाळी ७ वाजता शिवटेकडी येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयापासून जलदिंडीला सुरुवात झाली. अमरावती



महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवाणी यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून जलदिंडीचे उदघाटन करण्यात आले. या वेळी आनंद जवंजाळ, विवेक सोलंके, अरविंद मोकादम, प्रदीप कोल्हे, सुनिल राठी, राम विघे, संजय शिरभाते, डॉ. शरद मोहोड यांसह विविध मान्यवर उपस्थित होते. जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंते सुरेंद्र आडे, उमप, क्षीरसागर, गुजर तसेच अधीक्षक अभियंता रमेश ढवळे यांचीही उपस्थिती होती.

ही जलदिंडी शिवटेकडी येथून बसस्थानक, इर्विन चौक, पंचवटी, शासकीय तंत्रनिकेतन मार्गे अभियंता भवन (IEI केंद्र) येथे पोहोचली. जलदिंडीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलसंपदा विभाग तसेच विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांतील सुमारे ३०० जलप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यानंतर अभियंता भवन येथे भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच अमरावती जिल्ह्यातील सात नद्यांच्या पाण्याने भरलेल्या कलशांचे पूजन करून व्याख्यान सत्राला प्रारंभ झाला. प्रसिद्ध जलतज्ज्ञ अभिजीत घोरपडे यांनी ठपाणी आणि समानताठ या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

आपल्या व्याख्यानात त्यांनी जागतिक स्तरावरील पाणीटंचाई व असमानतेचे वास्तव मांडले. आजही जगातील सुमारे २६ टक्के महिला व मुलींना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध नसून सुमारे ११० कोटी महिला पाण्यापासून वंचित आहेत, असे त्यांनी नमूद केले.

## अमरावती महानगरपालिकेत IWMS प्रणाली प्रशिक्षण कार्यशाळा

### ♦ आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कामकाजात सुधारणा

प्रतिनिधी १ एप्रिल

**अमरावती:** अमरावती महानगरपालिकेच्या वतीने आज महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली IWMS (Integrated Worked Management Systemed) प्रणालीसंबंधी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. हे प्रशिक्षण कार्यशाळा विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे पार पडले.

कार्यक्रमात महानगरपालिकेचे उपायुक्त नरेंद्र वानखडे तसेच विविध विभागांचे अभियंते आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी उपस्थितांना IWMS प्रणालीचे उद्दिष्ट, फायदे आणि कार्यान्वयनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

IWMS प्रणालीचा मुख्य उद्देश महानगरपालिकेच्या कामकाजात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढवणे आहे. यामुळे प्रकल्प व्यवस्थापन, देखभाल, संसाधन व्यवस्थापन, कामाच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे आणि तांत्रिक अहवाल तयार करणे यासारख्या क्षेत्रांमध्ये मोठा बदल होणार आहे. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांगितले की, "IWMS प्रणालीचा योग्य वापर करून नागरिकांना जलद, कार्यक्षम आणि पारदर्शक सेवा देऊ शकतो.

कार्यशाळेत उपस्थित अभियंत्यांना प्रणालीचे तांत्रिक तपशील, डेटा एन्ट्री, मॉड्युल्सची कार्यपद्धती, अहवाल तयार करणे, तसेच प्रकल्प व्यवस्थापनाची नवीन पद्धत याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच, उपस्थितांना कार्यशाळेतून प्रत्यक्ष ॲप्लिकेशनवर प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले, ज्यामुळे प्रणाली अधिक प्रभावी आणि सहज वापरण्यायोग्य ठरेल.

प्रशिक्षणादरम्यान उपस्थित अभियंत्यांनी प्रणालीबाबत विचारणा केली, अनुभव व अडचणी मांडल्या आणि त्यावर प्रशिक्षकांनी प्रत्यक्ष मार्गदर्शन केले. या संवादात्मक सत्रामुळे प्रशिक्षण अधिक परिणामकारक ठरले आणि सहभागी अभियंत्यांना प्रणालीबाबत स्पष्टता मिळाली. उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनीही या चर्चेत सक्रिय सहभाग घेत, विविध अडचणी व सूचना नोंदवल्या.

महानगरपालिकेच्या कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे हे नागरिकांसाठी उत्कृष्ट सुविधा देण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. आपल्याकडे मनुष्यबळ कमी आहे, त्यामुळे आपल्याला अधिकाधिक तंत्रज्ञानाचा वापर करणे भविष्यासाठी गरजेचे आहे. ⁄ंए प्रणालीद्वारे कामकाज अधिक जलद, सोयीस्कर आणि पारदर्शक होईल, तसेच विविध विभागांमधील समन्वय सुधारेल. उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनीही याबाबत आपल्या समाधानाची व्यक्त केली आणि कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन केले.

अशा प्रकारच्या प्रशिक्षणांमुळे अमरावती महानगरपालिकेच्या प्रशासनात नव्या तंत्रज्ञानाचा समावेश वाढेल आणि नागरिकांना उच्च दर्जाची सेवा देणे शक्य होईल.

## ऑनलाईन अर्ज भरण्यास सुरुवात

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २१ जून रोजी

प्रतिनिधी १ एप्रिल

**अमरावती:** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) २१ जून रोजी घेण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. तसेच परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदन अर्ज व परीक्षा शुल्क २७ मार्च ते १६ एप्रिल या कालावधीत भरता येणार आहे, अशी माहिती परीक्षा परिषदेचे आयुक्त महेश चौथे यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे दिली.

राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व मंडळाच्या, सर्व माध्यमांच्या अनुदानित, विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षक पदावर नियुक्तीसाठी उमेदवारांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. इयत्ता पहिली ते पाचवीसाठी पेपर १, इयत्ता सहावी ते आठवीसाठी पेपर २ या पध्दतीने परीक्षा घेतली जाते. त्यानुसार दि. २१ जून रोजी सकाळी साडेदहा ते एक यावेळेत पेपर १ तर दुपारी २.३० ते पाच या वेळेत पेपर २ ची परीक्षा घेतली जाणार आहे.

ऑनलाईन अर्ज भरणे, परीक्षा शुल्क व अन्य माहिती परीक्षा परिषदेच्या htttps://mahatet.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. प्रवेशपत्राची ऑनलाईन प्रिंट ९ जून ते २१ जून दरम्यान उपलब्ध करुन दिल्या जाईल. प्रशासकीय अडचणींमुळे वेळापत्रकात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परीक्षार्थ्यांसाठी अद्ययावत माहिती परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल, याची परीक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे परीक्षा परिषदेव्दारे कळविण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि १ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com






## कार्यकारी अभियंत्याची भ्रष्ट नीतिमत्ता...

# कोट्यावधीच्या विकास कामात अनियमितता !



* कार्यकारी अभियंत्याची थेट ठेकेदारी, अनेक कामात भागिदारी
* राज्यमंत्री ना. इंद्रनील नाईकांच्या भूमिकेकडे अन्यायग्रस्तांचे लक्ष
* विधानसभेत आ. विजय वडेट्टीवार यांनी उघड केला जोशींचा भ्रष्टाचार

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी यांनी पोहरादेवीच्या ४०० कटीच्या विकासकामामध्ये अनियमितता करुन त्यांच्या मर्जीतील ठेकेदारांना मोठ्या रक्कमेची कामे विभागून दिलीत.तसेच त्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करण्यात आल्याबाबतची पुराव्यासह तक्रार काँग्रेसचे नेते आमदार विजय वडेट्टीवार यांचेकडे करण्यात आली.आमदार वडेट्टीवार यांनी या प्रकरणाबाबत विधानसभेमध्ये आवाज उठवून कार्यकारी अभियंता शुभम जोशी यांच्या भ्रष्टाचाराचा पाढा वाचला.त्यावेळी सभागृहात बांधकाम राज्यमंत्री ना.इंद्रनील नाईक उपस्थित होते.ना.नाईक यांनी शुभम जोशी यांच्या कार्यकाळातील सर्व गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्याची मागणी शासनाकडे केली आहे.आता ही चौकशी होवून शासनाच्या कोट्यवधी रूपयाला चुना लावणाऱ्यांवर कोणती कारवाई होणार ? याकडे अन्यायग्रस्त ठेकेदासह जागरूक नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे विद्यमान आणि बहुचर्चित कार्यकारी अभियंता शुभम जोशी पदोन्नती होण्यापुर्वी कारंजा लाड येथे बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता होते. त्यावेळी बंजारा समाजाची काशी असलेल्या तिर्थक्षेत्र पोहरादेवीच्या विकासासाठी शासनाने ६५० कोटीचा निधी दिला होता. हा निधी व्यवस्थित खर्च होवून पोहरादेवीचा सर्वांगिण विकास होणार असे चित्र रंगविण्यात आले.परंतु प्रत्यक्षात जोशी यांनी तत्कालीन पालकमंत्र्यांच्या पाठबळाने ही कामे त्यांच्या चेलेचपाट्यांना वाटून त्या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करून कोट्यवधीची वरकमाई केल्याचा आरोप जनतेकडून करण्यात आला.परंतु जोशी यांना राजाश्रय असल्यामुळे त्या प्रकरणाची चौकशी झालीच नसल्याचे समजते. जोशींच्या कार्यावर खुश होवून तत्कालीन पालकमंत्र्यांनीच जोशींचे प्रमोशन करून वाशीम जिल्ह्याची जहाँगिरी प्रदान केल्याचे सर्वश्रृत आहे. आता पुन्हा शासनाने ४०० कोटीचा निधी पोहरादेवीच्या विकासासाठी दिला.या कामामध्ये शुभम जोशी यांनी त्यांच्या मर्जीतील ठेकेदारांना मोठी कामे तोडून ३०,४०,५० लाखाची कामे दिलीत. आणि भागिदारी केल्याचा आरोपही अन्यायग्रस्तांकडून होत आहे. पोहरादेवीच्या विकास कामामध्ये अनियमितता, गैरव्यवहार, निकृष्ठ दर्जाची कामे झाल्याबाबत वरिष्ठांसह गुणवत्ता नियंत्रक विभागाकडे तक्रारी करण्यात आल्यात.त्या विभागाकडून जोशींना तब्बल २० पत्रे देण्यात आली.त्या एकाही पत्राचे उत्तर जोशी यांनी वरिष्ठाना दिले नाही.

याबाबतची पुराव्यासह माहिती कांग्रेसचे नेते आमदार विजय वडेट्टीवार यांचेकडे देण्यात आली.आ. वडेट्टीवार यांनी या गंभीर प्रकरणाची दखल घेवून विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शुभम जोशी व टीमचा भ्रष्टाचाराचा मुद्दा गाजवला.योगायोगाने त्यावेळी सभागृहात बांधकाम राज्यमंत्री ना.इंद्रनील नाईक उपस्थित होते. जोशींचे गॉडफादर आणि पुसदच्या बंगल्यामध्ये विळ्या भोपळ्याचे नातेआहे.पुर्वी पोहरादेवीच्या संत सेवालाल महाराजानंतर बंजारा समाजाची पुसदच्या बंगल्यावर श्रद्धा होती. आता या श्रद्धेसाठी चढाओढ सुरू झाल्याची चर्चा आहे.त्यामुळे बांधकाम राज्यमंत्री ना.इंद्रनील नाईक यांनी या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करून सर्व दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची शासनाकडे मागणी केलेली आहे.

पोहरादेवीचे प्रकरण सभागृहात गाजतअसतांनाच जोशी यांनी वाशीम येथील ३४ शासकीय निवासस्थानाच्या देखभाल दुरूस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त झालेल्या तिन कोटी ४० लाख रूपयाच्या निधीची ३१ मार्चपुर्वी मर्जीतल्या ठेकेदारांसोबत भागिदारी करून कोट्यवधीची कमाई केल्याचा पराक्रम केला आहे.आता शासन जोशींवर कोणती कारवाई करणार याकडे वाशीम जिल्ह्यातील जागरूक जनतेचे लक्ष लागलेले आहे.

## थोडक्यात

### क्रांतीसूर्य महात्मा फुले जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



सामाजिक क्रांतीचे प्रणेते, शिक्षणाचे पुरस्कर्ते आणि समतेचा दिप प्रज्वलित करणाऱ्या क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त वाशिम शहरात विविध उपक्रमांनी सजलेला भव्य जयंती उत्सव साजरा करण्यात येणार आहे. क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने या उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये सामाजिक एकता, बंधुभाव आणि प्रबोधनाचा संदेश देणारे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती उत्सव समितीच्या वतीने प्रसिद्ध पत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

या उत्सवानिमित्त शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजता भव्य मोटरसायकल सद्भावना रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली क्रांतिसूर्य महात्मा फुले व सावित्रीबाई फुले स्मारक परिसरातून प्रारंभ होऊन शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत फुले स्मारक येथेच रॅलीचा समारोप होणार आहे. या रॅलीद्वारे सामाजिक ऐक्य, समता आणि शिक्षणाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच सायंकाळी ६ वाजता प्रबोधनात्मक जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असून, ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. अशोक राणा यवतमाळ हे 'क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांचे समाजकार्य आणि आजची सामाजिक स्थिती' या विषयावर सखोल मार्गदर्शन करणार आहेत. तसेच सायंकाळी ६ वाजता प्रबोधनपर भव्य किर्तनाचा कार्यक्रम होत आहे. सत्यपाल महाराज यांचे शिष्य असलेले सप्तखंजेरी वादक युवा प्रबोधनकार पंकजपाल महाराज हे किर्तनातून समतेचा संदेश देणार आहेत. समाजातील सर्व नागरिक, युवक, महिला तसेच विद्यार्थी बांधवांनी या जयंती उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रमांना यशस्वी करावे, तसेच समतेचा व शिक्षणाचा संदेश प्रत्येकापर्यंत पोहोचविण्यास हातभार लावावा, असे आवाहन क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### रिसोड पोलिस स्टेशनमध्ये शांतता समितीची बैठक



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

येऊ घातलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवानिमित्त रिसोड पोलीस स्टेशन यांच्या वतीने महत्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती. ही बैठक ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

बैठकीत उत्सव शांततेत व कायद्याच्या चौकटीत पार पडावा यासाठी विविध सूचना देण्यात आल्या. डीजे (ध्वनीप्रक्षेपक यंत्रणा) वापरण्यावर निर्बंध असल्याचे स्पष्ट करण्यात आले असून, डेसिबल मर्यादेचे पालन करणे बंधनकारक आहे. त्यामुळे नागरिकांनी पारंपरिक वाद्यांचा वापर करून डीजे टाळावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी ठाणेदार चव्हाण यांनी विशेष नमूद केले की, रिसोड येथे नुकतेच पार पडलेले गणेश विसर्जन देखील 'डीजे मुक्त' पद्धतीने साजरे करण्यात आले होते.




## घरकुल योजनेतील लाचखोरी भोवणार, चौकशी होणार ...

# घरकुलाला घरघर, पैशासाठी मरमर !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



जिल्ह्यातील ग्रामीण आणि शहरी भागात आजही असे अनेक कुटुंब आहेत की त्यांना आजही राहायला स्वतःचे हक्काचे घर नाही. ग्रामीण भागात तर ही संख्या लक्षणीय असून आर्थिकदृष्ट्या दुर्बळ असलेल्या ईतर मागास प्रवर्गातील कित्येक गोरगरीब मोडकळीस आलेल्या धोकादायक घरात वास्तव्य करत आहेत. ही बाब गांभीर्याने लक्षात घेऊन केंद्र आणि राज्यातील सरकारने ६०-४० च्या प्रमाणात अनुदान देण्याचा निर्णय घेत ठोस पावले उचलली आहेत. प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेत पहिल्यांदाच ईतर मागास प्रवर्गातील दुर्बळ घटकांना समाविष्ट करण्यात आले आहे. परिणामी आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या गरीबांच्या मोडकळीस आलेल्या धोकादायक घरांचा नव्याने जीर्णोद्वार होणार हे निश्चित झाले आहे. मात्र काही गावातील सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि ग्रामसेवक यांनी संगनमताने ५ ते १० हजार रुपये घेऊन लाभार्थ्यांची निवड केली असल्याची खळबळजनक माहिती समोर येत आहे. त्यामुळे गरजू व पात्र लाभार्थ्यांना डावलून सधन व अपात्र असलेल्या बोगस लाभार्थ्यांची मोठ्या प्रमाणात निवड करण्यात आल्याचे पुरावे हाती आले आहेत. यात पंचायत समिती स्तरावरिल अधिकारी आणि कर्मचारी यांनी लाच घेऊन हप्ते सोडण्याचे सोपस्कार पार पाडले असल्याची धक्कादायक बाब उघडकीस येत आहे. याबाबत राष्ट्रीय पातळीवरून देखरेख करणाऱ्या समितीने एक अहवाल तयार केला असून योजनेच्या अंमलबजावणीचे मूल्यांकन केल्यानंतर भ्रष्टाचार होत असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. त्या अनुषंगाने या प्रकरणाची चौकशी होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली असून लाच घेणे संबंधितांना चांगलेच भोवणार असल्याचे बोलले जात आहे.




प्राप्त माहितीनुसार, रिसोड आणि मालेगांव तालुक्यात मोठ्या प्रमाणात घरकुल अनुदान वाटपात अपहार झाल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून समोर येत आहे. यात काही गावातील सरपंच, उपसरपंच व त्यांना ५ वर्षासाठी साथसंगत देणाऱ्या काही सदस्यांना सुद्धा घरकुल वाटपाचा कोठा वाटून देण्यात आला आहे. आणि या प्रत्येकांच्या कोठ्यात सबंधित ग्रामसेकाची टक्केवारी ठरवून दिली आहे. त्यामुळे कोणी मर्जीतल्या लाभार्थ्यांकडून ५ हजार रुपये घेतले आहेत तर काहींनी आसामी पाहून १० हजार रुपये उकळले आहेत. यासाठी लाभार्थीच्या नावावर जागेची अट असताना तिथे खोट्या माहितीची पूर्तता करून घरकुलं मंजूर करण्यात आली आहेत. तर एकाच रेशनिंग कार्डवरील दोन किंबहुना काहींना तर एकाच कुटुंबात तीन घरकुलांचे अनुदान देण्यात आले असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. एव्हढेच नव्हे; तर ज्यांच्याकडे २० ते ५० एकर शेती असून चारचाकी गाड्या नावावर आहेत अशा बोगस लाभार्थ्यांना सुद्धा घरकुल अनुदान देण्यात आले असल्याची लज्जास्पद बाब उघडकीस येत आहे. त्याचप्रमाणे घरे पूर्ण नसतांना उतारे नोंदणी, घर पूर्ण झाल्याचा दाखला, तसेच दारे, खिडक्या, प्लास्टर, शौचालय नसतांनाही तीन महिने आधीच खोट्या नोंदणी करून घरकुलांची बिले काढण्यात आली आहेत व आजमितीस सुद्धा उपरोक्त प्रकार बेधडकपणे सुरू असल्याचे बोलले जात आहे.

गावपातळीवर एव्हढ्या मोठ्या प्रमाणात गैरप्रकार होत असतांना सबंधित पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कुठलीही शहानिशा करत नाहीत, सबंधित गृह अभियंता निमुटपणे संमती देतात याचा अर्थ ज्याची त्याला योग्य ती रसद पोहचत असल्याचे स्पष्ट होत आहे. मात्र व्यवस्थेतील अशा भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांमुळे ग्रामीण भागातील शेकडो पात्र लाभार्थ्यांच्या तोंडाला पाने पुसली जात आहेत. शिवाय शासनाच्या स्तुत्य हेतुला सुरुंग लावून गरिबांसाठी असलेल्या महत्वाकांक्षी योजनेची वाट लावली जात आहे.

### घरकुल योजनेसाठी तब्बल ११६१ कोटी...

राज्यातील सर्व गोरगरिबांना स्वतःच्या मालकीच घर मिळवून देण्यासाठी सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. मध्यंतरी निधीची कमतरता भासल्याने अनेक गरिबांचे हप्ते रखडले होते.त्यातच चपराश्यांपासून ते मोठ्या साहेबांपर्यंत उसनवारी करून कमिशन देणारे लाभार्थी चांगलेच आर्थिक संकटात सापडले होते. मात्र प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर अखेर २८ फेब्रुवारी २०२६ रोजी एका महत्त्वपूर्ण शासन निर्णयाद्वारे ( उं ) घरकुल अनुदानासाठी मोठ्या निधीला मंजुरी देण्यात आली. यासाठी तब्बल ११६१ कोटी रुपयांचा घसघशीत निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामध्ये राज्य शासनाचा ४६४ कोटी ४७ लाख रुपये, तर केंद्र सरकारचा ६९६ कोटी ७१ लाख रुपयांचा वाटा आहे. या एका निर्णयामुळे रखडलेले सर्व हप्ते आता मार्गी लागणार आहेत. मात्र गरिबांच्या या हक्काच्या पैशावर आता कोणकोण डल्ला मारते हे पाहणे खुप महत्वाचे ठरणार आहे.

## वारंवार वार, काम दमदार, चव्हाण ठाणेदार...

# रिसोड पोलीसांची पुन्हा कारवाई; तीन गुन्हे उघडकीस, ४ लाखांचा मुद्देमाल जप्त !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●



रिसोड पोलीसांनी वेगवेगळ्या ठिकाणी घडलेल्या चोरी व दरोड्याच्या तीन गुन्ह्यांचा छडा लावून तब्बल सुमारे ४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. बिबखेडा शेतशिवारात दत्ता उगले यांच्या घरात घुसून अज्ञात तिघांनी चाकूचा धाक दाखवत सोन्या-चांदीचे दागिने, मोबाईल व रोख रक्कम असा ८१ हजार रुपयांचा ऐवज लुटला होता. तसेच चाकोली येथे विकास जायभाये यांच्या घरात चार आरोपींनी चाकूचा धाक दाखवून ३० हजारांचा ऐवज चोरला. याच वेळी शेजारील आसाराम पोटे यांच्या घरातूनही २८ हजारांचा मुद्देमाल चोरीस गेला होता.

या प्रकरणाचा तपास करताना पोलीसांनी तांत्रिक माहिती व गुप्त बातमीदारांच्या मदतीने दोन आरोपींना अटक केली. त्यांच्या ताब्यातून सोन्या-चांदीचे दागिने, मोबाईल, जिवंत काडतूस, खंजीर व पल्सर मोटारसायकल असा ३ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे.

दरम्यान, चाफेश्वर चौकातील एका किराणा दुकानातून ७,५०० रुपयांचे कॅन चोरी करणाऱ्या आरोपीला अवघ्या दोन तासांत अटक करून मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या कार्यकाळात गुन्हेगारांवर लगाम रिसोड पोलीस स्टेशनला पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण रुजू झाल्यापासून घरफोडी, मारहाण, सोने लूट, चोरी, दुकानफोडी असे एक ना अनेक गुन्हे अल्पावधीत उघडकीस आणण्यात आले आहेत. अनेक प्रकरणांमध्ये काही तासांतच आरोपींना जेरबंद करण्यात आले असून त्यांच्या धडाकेबाज कारवाईमुळे परिसरातील गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.ही कारवाई पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली डी.बी. पथकाने केली असून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

### इंधन वाचवा, देश वाचवा, पोस्टरद्वारे प्रभावी जनजागृती !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



वाढती महागाई आणि इंधनाची टंचाई लक्षात घेता भविष्यातील ऊर्जा बचतीसाठी आजच्या पिढीने पुढाकार घेणे अत्यंत गरजेचे आहे. याच उद्देशाने स्थानिक श्री बाकलीवाल विद्यालय, वाशीम येथील एनसीसी कॅडेट्सनी रविवारी (२९ मार्च) 'इंधन बचत' या विषयावर विशेष जनजागृती मोहीम राबवली.

या उपक्रमात विद्यालयातील एकूण ४८ कॅडेट्सनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. केवळ घोषणा न देता विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या कल्पक व माहितीपूर्ण पोस्टर्सच्या माध्यमातून स्वयंपाकघरातील गॅस बचतीचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. इंधन वाचवा, देश वाचवा आणि गॅसची बचत, पैशांची भरभराट अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कॅडेट्सनी आपल्या पोस्टर्समधून दैनंदिन जीवनातील काही सोपे पण प्रभावी उपाय नागरिकांसमोर मांडले. अन्न शिजवताना भांड्यावर झाकण ठेवल्यास १५ ते २० टक्के गॅसची बचत होते, गॅस पेटवण्यापूर्वी आवश्यक तयारी केल्यास इंधनाची नासाडी टळते, बर्नर स्वच्छ ठेवल्यास निळी ज्योत मिळून गॅसची बचत होते, तसेच प्रेशर कुकरचा वापर केल्याने वेळ आणि इंधन दोन्ही वाचते. फ्रिजमधील पदार्थ थेट गॅसवर न ठेवता सामान्य तापमानाला आणणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कॅडेट्सनी सुरक्षिततेवरही विशेष भर दिला. स्वयंपाक झाल्यानंतर रेगुलेटर बंद ठेवणे ही सवय गॅस गळती रोखण्यासाठी व संभाव्य अपघात टाळण्यासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
बुधवार, दि. १ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# डीपी पळविल्या प्रकरणी अन्यायग्रस्त शेतकऱ्यांचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

प्रतिनिधी १ एप्रिल




**खामगांव :** मौजे पिंप्री गवळी येथील शेतकरी यांनी खामगांव उपविभागीय अधिकारी श्री पुरी यांचे मार्फत जिल्हाधिकारी यांना अन्याय ग्रस्त शेतकऱ्यांची मंजूर डी पी तात्काळ लावण्याबाबत व संबंधीत भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन ?दिले. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष नरेंद्र शिंगोटे यांनी अन्यायग्रस्त शेतकऱ्यांची मागणी उपविभागीय अधिकारी यांच्यासमोर मांडली.

मागील २ महिन्यापासून खामगांव मतदार संघातील पिंप्री गवळी येथील भगत डी पी ही मा.ना आकाशदादा फुंडकर यांच्या मार्फत मंजूर करण्यात आली परंतु पिंप्री गवळी येथून माजी सरपंच पती राजू बगे यांनी उपविभागीय कार्यकारी अभिंयता जैस्वाल यांच्याशी संगनमत करुन उपरोक्त डी पी भगत डी पी ऐवजी काळे देशमुख डी पी वर बसविली. या प्रकरणी संबंधीतांना ३ लाख रुपये गोळा करुन भ्रष्टाचार केला आहे. तसेच उपरोक्त ठिकाणी अवैध रोहित्र बसविले आहे. एकीकडे शासन अवैध कनेक्शनवर कारवाई करतांना लाखो रुपये दंड करते तर दुसरीकडे महावितरणचे अधिकारी पैसे घेऊन अवैध डी पी च बसवून देतात हा महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराचा नवीन प्रकार समोर आला आहे. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. अवैध डी पी प्रकरणी संबंधीत अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करणे आवश्यक असतांना आर्थीक हितसंबंधामुळे दबलेले अधिकारी या प्रकरणी वेळखाऊ पणा करीत आहेत. भगत डी पी वरील शेतकऱ्यांवर हा एक प्रकारे अन्यायच आहे. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी तसेच पिंप्री गवळी येथे मंजूर करण्यात आलेली भगत डी पी तात्काळ बसविण्यात यावी अशी मागणी यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष नरेंद्र शिंगोटे यांनी केली. डी पी मंजूर होउन दोन महिने झाले परंतु अद्याप पर्यंत डीपी बसविली नाही. याबाबत कार्यकारी अभियंता महावितरण खामगांव यांना दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी या शेतकऱ्यांनी लेखी निवेदन दिले. परंतु ज्या शेतकऱ्यासाठी डी पी मंजूर झाली ते बसविण्यात येत नाही. व पैसे घेऊन अवैध डी पी बसविण्यासाठी महावितरणचे अधिकारी तत्परता दर्शवितात. यामागे आर्थीक हितसंबंधच आहेत. सदरच्या माजी सरपंच पतीने पैसे गोळा करुन अवैध डी पी बसविली आहे. परंतु आज आकाशदादांनी जी डी. पी. मंजूर केली ती लागलेली नाही. आज या शेतकऱ्यांच्या शेतात कांदयाचे पिक उभे आहे. येत्या काही दिवसात पिकाला पाणी दिले नाही तर पिक जळून जाईल त्यामुळे याठिकाणी तात्काळ डी पी बसविण्यात यावी. ज्याच्या शेतात डी पी बसविली नाही ते पण शेतकरीच आहेत. त्याच्यावर देखील कर्ज आहे. ते उद्योग पती नाहीत. त्यांच्या पिकांसाठी देखील डी पी ची आवश्यकता आहे व त्यासाठीची डी पी मंजूर केली आहे. त्यामुळे अवैध गोष्टी करणाऱ्यांनी गरीब शेतकऱ्यांना हाताशी धरुन स्टंटबाजी करु नये. यावेळी अन्यायग्रस्त शेतकरी चेतन फुंडकर, धर्मेध अवथळे, लक्ष्मण अवथळे, राजेंद्र मोतीराम इंगळे, कैलास पुंडलीक इंगळे, गणेश लक्ष्मण खेडकर, प्रल्हाद महादेव भगत, गजानन तुळशीराम सुडोकार, पुरुषोत्तम लांडे, भास्कर जगलु इंगळे, गजानन काशिराम फुंडकर व गजानन भोबळे, तसेच या शेतकऱ्यांच्या पाठीशी ठाम पणे उभे असलेले भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी श्री शरदचंद्र गायकी, एकनाथ पाटील, तालुकाध्यक्ष नरेंद्र शिंगोटे, महिला आघाडी अध्यक्षा श्रध्दा धोरण, युवा मोर्चा अध्यक्ष राज पाटील, व शिवशंकर होनाळे, तसेच नगेंद्र रोहणकार, मुन्ना दळी, उल्हास वानखडे, गजानन गाडे, सुनिल वानखडे, शामराव पडवाळ, विजय मालाणी, सतीष ताठे, वासुदेव सातव, सुरज दुबे, वंसतराव वानखडे, युनुस खान भाजपाचे सर्व शक्ती केंद्र प्रमुख हे देखील शेतकऱ्यांना साथ देण्यासाठी आले होते.

# खंडोबा मंदिरामध्ये 12 गाड्या ओढण्याची परंपरा

◆ दर्शनासाठी गुरुवारी २४ तास मंदिर खुले राहणार



प्रतिनिधी १ एप्रिल

**खामगाव :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव शहरात पुरातन खंडोबा मंदिरामध्ये गुरुवार दिनांक २ एप्रिल रोजी हनुमान जयंतीच्या दिवशी भव्य खंडोबा यात्रा महोत्सव महात्मा बसवेश्वर चौक जगदंबा रोड येथे खंडोबा यात्रा महोत्सव भरते बुलढाणा जिल्ह्यातील एकमेव जुनी परंपरा म्हणून या यात्रेकडे बघितले जाते सुमारे १५० वर्षाची परंपरा लाभलेली आहे ब्रिटिश काळापासून सुरू असलेल्या यात्रेला फार महत्त्व आहे जागृत व नवसाला पावणारी खंडोबा यात्रा असून येथे गडकरी भक्तगण १२ गाड्या ओढून नवस फेडतात खामगाव सह बुलढाणा जिल्ह्यातील पंचकोशीतील हजारो भक्तगण मोठ्या प्रमाणात श्रद्धेपोटी दर्शनासाठी येतात ही यात्रा खामगाव शहरातील सर्वात मोठी यात्रा असून पुरातन खंडोबा मंदिरामध्ये ९ नऊ दिवस आधी खंडोबाचे घट बसविल्या जातात ही यात्रा सुमारे ३ दिवस चालते ही परंपरा अबाधित ठेवण्यासाठी गडकरी ( १२ बैलगाड्या ओढणारे ) यांना विशेष मान आहे या गडकऱ्यांचे विधीवत पूजन करू खामगाव शहरातून मिरवणूक काढण्यात येते तत्पूर्वी गळकऱ्यांची हळद लावणे सोहळा मंदिरात पार पडतो सर्व धर्मीयांचा सहभाग विशेष म्हणजे ऐतिहासिक आणि महाराष्ट्रातील एकमेव बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव शहरात साजरा होणारा शांती महोत्सवाच्या ( मोठी देवी ) ठिकाणी म्हणजेच जगदंबा रोड महात्मा बसवेश्वर चौक येथे खंडोबाचा उत्सव पार पडतो मोठी देवी परिसरातच हा महोत्सव साजरा होतो त्यामुळे या उत्सवाचे अनन्यसाधारण महत्व असून कमल सिंह गौतम चौकातून बारा बैलगाडे उडण्यात येतात या उत्सवात सर्व धर्मीयांचा सहभाग असतो सर्व धर्मीयांचा सहभाग असतो १२ बैलगाडी १५० वर्ष पुरातन परंपरा जोपासण्यासाठी खंडोबा मंडळाची प्रयत्न आहे यंदा गुरुवारी सायंकाळी हा सोहळा पार पडणार आहे तत्पूर्वी खंडोबा मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम पार पडत आहे. भाविक भक्तांनी खंडोबा मंदिरात दर्शनासाठी खंडोबा यात्रा महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# खामगावात तहसीलदारांच्या अंगावर घातले वाहन

◆ पारखेड येथील घटना : वाळू वाहतुकीच्या ट्रकवर कारवाई

प्रतिनिधी १ एप्रिल

**खामगांव :** तालुक्यातील पारखेड परिसरात सुरू असलेल्या वाळूच्या अवैध वाहतुकीवर तहसील प्रशासनाने धाडसी कारवाई करत एक ट्रक पकडल्याची घटना उघडकीस आली आहे. या कारवाईदरम्यान तहसीलदार सुनील पाटील यांच्या अंगावर वाहन

घालण्याचा प्रयत्न झाल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. माहितीनुसार, पारखेड परिसरातून रेतीची अवैध वाहतूक सुरू असल्याची माहिती तहसीलदारांना मिळाली होती. त्यानंतर त्यांनी तत्काळ स्वतः घटनास्थळी धाव घेत राष्ट्रीय महामार्गावर संशयित ट्रकचा पाठलाग सुरू केला. संबंधित ट्रकचा क्रमांक एमएच. २८ बीबी. ७३१४ असा असल्याचे समोर आले आहे. तहसीलदारांनी वारंवार इशारे देऊनही चालकाने ट्रक थांबविण्यास नकार दिला.

उलट, अधिक वेगाने वाहन चालवत पळून जाण्याचा प्रयत्न केला. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे लक्षात येताच तहसीलदारांनी स्वतःचे वाहन ट्रकसमोर आडवे लावून अडवण्याचा प्रयत्न केला. यावेळी चालकाने थेट तहसीलदारांच्या दिशेने ट्रक घालण्याचा प्रयत्न केल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. तरीही तहसीलदारांनी धैर्य न गमावता पाठलाग सुरू ठेवला. चालकाने हायवेवर यू-टर्न घेत पुन्हा पळ काढण्याचा प्रयत्न केला,

**पोलिस ठाण्यात तक्रार**

अखेर प्रशासनाच्या सततच्या प्रयत्नांमुळे ट्रक अडवण्यात यश आले. या कारवाईत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी प्रसंग अत्यंत धोकादायक होता. घटनेनंतर खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# लोणार सरोवराचा होणार कायापालट !

◆ विभागीय आयुक्तांचा प्रस्ताव, ९.८८ कोटींच्या निधी वितरणास मंजुरी

प्रतिनिधी १ एप्रिल

**बुलडाणा :** जागतिक वारसा स्थळ असलेल्या बुलडाणा जिल्ह्यातील लोणार सरोवराचे जतन, संवर्धन आणि विकास करण्यासाठी राज्य सरकारने आता गती दिली आहे. लोणार सरोवर विकास आराखड्यांतर्गत वर्ष २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ९ कोटी ८८ लाख १० हजार रुपयांचा निधी वितरित करण्यास नियोजन विभागाने मंजुरी दिली आहे. विशेष म्हणजे, अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयाने केलेल्या विनंतीची दखल घेत शासनाने हा निधी तातडीने उपलब्ध करून दिला आहे. लोणार सरोवराच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची आवश्यकता असल्याचे नमूद करत अमरावती विभागीय आयुक्तांनी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्य शासनाकडे पत्राद्वारे मागणी केली होती. सरोवराचे जतन आणि विकास आराखड्यांतर्गत सुरू असलेल्या कामांना गती देण्यासाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षात निधी उपलब्ध करून देण्याची विनंती त्यांनी केली होती. या विनंतीचा सकारात्मक विचार करून शासनाने आता हा महत्त्वपूर्ण निधी प्रशासकीय नियंत्रक म्हणून विभागीय आयुक्तांकडे सुपूर्द केला आहे.

लोणार सरोवराच्या जतन आणि संवर्धनासाठी एकूण ४३४.६१ कोटी रुपयांच्या सुधारित प्रशासकीय आराखड्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या आराखड्यांतर्गत सरोवराचे ३ नैसर्गिक सौंदर्य अबाधित राखणे, परिसरातील जैवविविधतेचे रक्षण करणे आणि पर्यटकांसाठी जागतिक दर्जाच्या सोयीसुविधा निर्माण करणे ही मुख्य उद्दिष्टे आहेत. यामध्ये प्रामुख्याने सरोवराच्या ३ काठावरील प्राचीन मंदिरांचे जतन, पर्यटकांसाठी पदपथ (पायवाटा), संरक्षक भिंतींचे बांधकाम, सांडपाणी व्यवस्थापन आणि निसर्ग पर्यटन केंद्र विकसित करणे यांसारख्या मोठ्या बांधकामांचा समावेश आहे.

**या प्रकल्पासाठी आतापर्यंत १२३.२४ कोटींचा निधी खर्च**

या भव्य विकास प्रकल्पासाठी आतापर्यंत एकूण १२३.२४ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. ताज्या शासन निर्णयानुसार मिळालेला ९.८८ कोटींचा निधी हा मोठ्या बांधकामावर खर्च केला जाणार आहे. हा निधी मिळाल्यामुळे आराखड्यातील प्रलंबित कामे पूर्ण होण्यास मदत होणार असून, लोणार सरोवराचा कायापालट होण्याच्या प्रक्रियेला वेग येणार आहे. या कामांच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याची आणि उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी अमरावती विभागीय आयुक्तांवर सोपवण्यात आली आहे.

# अवकाळी पावसामुळे खामगाव तालुक्यात 150 हेक्टरवरील पिकांचे नुकसान !

प्रतिनिधी १ एप्रिल

**खामगाव :** वादळी वारा आणि अवकाळी पावसामुळे खामगाव तालुक्यातील काही गावांमध्ये उन्हाळी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. कृषी विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, सुमारे १५० हेक्टरवर उगमलेल्या पिकांना अवकाळी पावसाचा फटका बसला असून यामध्ये प्रामुख्याने कांदा, मका, भाजीपाला आणि काही ठिकाणी फळबागांचा समावेश आहे. सध्या अनेक भागांत उन्हाळी कांदा काढणी सुरू आहे. ३० मार्चच्या सायंकाळी अचानक हवामानात बदल होऊन वादळी वारा आणि अवकाळी पाऊस सुरू झाला.शहापूर आणि बोरी अडगाव परिसरात विशेषतः वादळी वारा आणि पावसाची तीव्रता जास्त होती.

## कांदा, मका, भाजीपाला आणि फळबागांना फटका



स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितले की, अचानक आलेल्या या पावसामुळे शेतातील कांदा भिजला आहे, कांद्याच्या बियाण्यालाही नुकसान झाले आहे, तसेच मका, भाजीपाला आणि काही फळबागांमध्ये झाडे उन्मळून पडली आहेत. वादळी वाऱ्यामुळे अनेक गावांमध्ये वीजपुरवठा देखील खंडित झाला होता. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागला. तालुक्यातील अनेक गावांमध्ये या पावसामुळे शेतीपिक उद्ध्वस्त झाले.

# चुलीच्या धुरावरून वाद; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी १ एप्रिल

**मलकापूर :** गेल्या काही दिवसांपासून गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्याने ग्रामीण भागासह शहरातही चुली पेटू लागल्या आहेत. चुलीच्या धुरामुळे त्रास होत असल्याच्या कारणावरून शेजाऱ्यांमध्ये वाद निर्माण होऊन काळेगाव येथे शनिवारी मारहाणीची घटना घडली. या प्रकरणी चार जणांविरुद्ध मलकापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विजय भावराव तायडे (वय २५, रा. काळेगाव, ता. मलकापूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २८ मार्च रोजी सकाळी सुमारे ९ वाजता घरातील गॅस संपल्यामुळे त्यांनी चुलीवर स्वयंपाक सुरू केला. यावेळी धुरामुळे त्रास होत असल्याचे सांगत शेजारी राहणाऱ्यांनी जाब विचारला. त्यातून वाद वाढत जाऊन मारहाणीपर्यंत प्रकरण पोहोचले. आरोपी विजय शंकर दाभाळे, अजय शंकर दाभाळे, अविनाश शंकर दाभाळे आणि सुनीता विजय दाभाळे (सर्व रा. काळेगाव, ता. मलकापूर) यांनी फिर्यादीला मारहाण करून शिवीगाळ केली व जखमी केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोहेकॉ विक्रम राजपूत करीत आहेत.



# आसोला खुर्द यात्रेत अवैध दारू विक्रीवर पोलिसांचा छापा ; 19 वर्षीय तरुण अटकेत

प्रतिनिधी १ एप्रिल

**वाशिम मानोरा :** तालुक्यातील आसोला खुर्द येथे आयोजित श्री सोमनाथ महाराज यात्रा दरम्यान मानोरा पोलिसांनी अवैध दारू विक्रीवर मोठी कारवाई करत १९ वर्षीय तरुणाला रंगेहात अटक केली. त्याच्या कडून सुमारे १६ हजार ३१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहिती नुसार, यात्रे दरम्यान परिसरात भाविकांची मोठी गर्दी होत असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन सतर्क होते. याच पार्श्वभूमीवर मानोरा पोलीस स्टेशनच्या ठाणेदार नैना पोहेकर पथकासह स्वतः पायदळ पेट्रोलिंग करत होत्या. दरम्यान, आरोपी यश राम जाधव (वय १९) हा पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांच्या विक्रीच्या आडून अवैध देशी व विदेशी दारूची विक्री करत असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी तत्काळ पंचासमक्ष कारवाई करत त्याला ताब्यात घेतले व त्याच्या कडील दारू जप्त केली. या प्रकरणी आरोपीविरुद्ध दारूबंदी कायदा अंतर्गत मानोरा पोलीस



ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. पोलीस अधिकारी नैना पोहेकरयांचे मार्गदर्शना खाली कॉन्स्टेबल राधेश्याम महल्ले, पोलीस शिपाई रोहन तायडे, शेख फिरोज तसेच महिला पोलीस शिपाई शितल तराळे यांच्या पथकाने केली. पोलिसांच्या या तत्पर कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मुंडगावच्या उपोषणाची ४थ्या दिवशी सांगता

◆ १५ दिवसात कारवाईचे लेखी आश्वासन



प्रतिनिधी १ एप्रिल

**अकोट:** मुंडगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर अमीनपूर येथील ६ महिला व २ पुरुषांनी पुकारलेले आमरण उपोषण अखेर चौथ्या दिवशी मागे घेण्यात आले. प्रशासनाने येत्या १५ दिवसांत मागण्या पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषणकत्यांनी लिंबू सरबत प्राशन करून आंदोलन स्थगित केले. मात्र, या आंदोलनाकडे ग्रामपंचायत सरपंचांनी पाठ फिरवल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अमीनपूर येथील समाजमंदिराच्या मागील मोकळ्या जागेचा रीतसर ८-अ उतारा मिळावा, या मागणीसाठी मंगला पोहोरकर, सिंधू सोनोने, नीता गवई, मालता पिंपळे, कमला सरकटे, सपना पुंडकर, तोताराम सरकटे आणि सुरेश सरकटे यांनी २७ मार्चपासून आमरण उपोषण सुरू केले होते.

या जागेबाबत सरपंच व ग्रामसेवक हेतुपुरस्सर दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला होता. अखेर अकोटचे गटविकास अधिकारी रमाकांत माळी, विस्तार अधिकारी मदनसिंग बहुरे यांनी आश्वासन दिल्याने उपोषण संपविले.

# मार्च एन्डींग : १९९.७९ कोटी रुपये थकीत!

◆ मनपातील वास्तव : केवळ ८०.३२ कोटींची वसुली

प्रतिनिधी १ एप्रिल


**अकोला :** 'मार्च एंडिंग'च्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आर्थिक स्थितीचे चित्र चिंताजनक असल्याचे समोर आले आहे. शहराच्या विकासासाठी महत्त्वाचा असलेला कर अपेक्षेपेक्षा अत्यंत कमी प्रमाणात जमा झाल्याने महापालिकेच्या तिजोरीवर ताण वाढला आहे.

महापालिकेची शास्तीसह एकूण कर मागणी सुमारे २८४.३६ कोटी रुपये इतकी असताना प्रत्यक्ष वसुली केवळ ८०.३२ कोटी रुपये झाली आहे. परिणामी तब्बल १९९.७९ कोटी रुपये थकीत राहिले असून, करवसुलीची गती अत्यंत मंद असल्याचे स्पष्ट झाले आहे. सामान्य कराच्या बाबतीतही हीच स्थिती दिसून येते. एकूण १०२.६६ कोटी रुपये मागणी असताना प्रत्यक्ष वसुली फक्त ४१.७१ कोटी रुपये झाली आहे. त्यामुळे थकीत आणि चालू कर मिळून मोठी रक्कम अद्याप वसूल व्हायची बाकी आहे.

महानगरपालिकेची शास्तीसह एकूण कर मागणी सुमारे २८४.३६ कोटी रुपये इतकी असताना प्रत्यक्ष वसुली केवळ ८०.३२ कोटी रुपये झाली आहे. परिणामी जवळपास १९९.७९ कोटी रुपये थकीत राहिले असून, करवसुलीची गती अत्यंत मंद असल्याचे स्पष्ट झाले आहे. सामान्य कराची एकूण मागणी १०२.६६ कोटी रुपये असून, वसुली केवळ ४१.७१ कोटी रुपये झाली आहे. थकीत व चालू कर मिळून मोठी रक्कम अद्याप बाकी आहे. मालमत्ता कर हा महापालिकेचा मुख्य महसुली स्त्रोत असतानाही अपेक्षित वसुली न झाल्याने आर्थिक नियोजनावर थेट परिणाम होत आहे. पाणीपट्टीचेही ७० कोटीपैकी १२ कोटींची वसूल महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने चालू आर्थिक वर्षात १२ कोटी रुपयांची पाणीप पाणीपट्टी वसुली केली असली तरी, तब्बल ७० कोटी रुपयांच्या थकबाकीचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. महापालिका क्षेत्रात अधिकृत नळधारकांची संख्या सुमारे ७४ हजार इतकी आहे; मात्र शहरातील एकूण मालमत्तांची संख्या पावणे दोन लाखांपेक्षा अधिक असल्याचे समोर आले आहे. या तुलनेत अधिकृत नळधारकांची संख्या अत्यल्प असल्याने महसूल तुटीचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

# आता नाही तुंबणार शहरातील नाल्या !

प्रतिनिधी १ एप्रिल





**अकोला :** अकोला शहरात साफसफाई ची समस्या कायमच आहे. शहरात पडित वार्ड ची रचना करून नगरसेवक व संबंधित ठेकेदारांना चराईचे कुरण उपलब्ध करून देण्यात आले आहे दर महिन्याला सफाई पोटी लाखो रुपये खर्च होत असल्यामुळे शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य दिसून येत आहे. आता या समस्येवर हळूहळू तोडगा काढण्याचा प्रयत्न होत आहे राष्ट्रीय शुद्ध हवा अनुदान अंतर्गत केंद्र सरकारतर्फे महापालिकेला निधी मिळत आहे या निधी अंतर्गत महापालिकेला काही दिवसांपूर्वी शहरातील मुख्य रस्त्यांची सफाई करण्यासाठी तीन स्वीपर मशीन गाड्या उपलब्ध झाल्या होत्या त्यामुळे रस्ते सफाईचा प्रश्न मार्गी लागणार आहे पावसाळ्यात अनेकदा मोठे नाले व लहान मोठ्या नाल्या तुंबल्यामुळे नागरिकांच्या घरात पाणी जाण्याची समस्या दरवर्षी उद्भवते. त्यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान होते आता या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महापालिकेला स्लीपर मशीन सारखीच आधुनिक ड्रेन क्लिनिंग मशीन उपलब्ध झाली आहे. शहरातील अनेक लहान मोठ्या नाल्या अशा आहेत की ज्यावर नागरिकांनी पायऱ्या बांधल्या आहेत तर काही ठिकाणी स्लॅब टाकून ठेवण्यात आले आहेत त्यामुळे या नाल्यांची सफाई करण्यासाठी सफाई कर्मचाऱ्यांच्या नाकी नऊ येत असत. परंतु आता ड्रेन क्लीनिंग मशीनच्या सहाय्याने पाईपलाईन आणि गटार प्रणाली मधील अडथळे, चिवट कचरा, प्लास्टिकचा कचरा काढणे सोपे होणार आहे प्लंजर किंवा ड्रेन स्नेक सारख्या घरगुती उपकरणाच्या विपरीत ही मशीन पाईप पूर्णपणे स्वच्छ करण्यासाठी उच्च दाबाच्या पाण्याच्या फवाऱ्याचा वापर करते ही मशीन शहरी स्वच्छता बांधकाम स्थळ आणि औद्योगिक वातावरणातील अवघड कामांसाठी आदर्श मानली जाते त्यामुळे या मशीनच्या सहाय्याने शहरातील तुंबलेल्या लहान मोठ्या नाल्यांची सफाई करणे सुलभ होणार आहे त्यामुळे यंदा पावसाळ्यात नाल्या तुंबून रस्त्यावर पाणी वाहने तसेच नागरिकांच्या घरात पाणी घुसण्याच्या समस्येवर अंकुश लागण्यास मदत होईल.

♦ आधुनिक ड्रेन क्लीनिंग मशीन मनपात दाखल

# शहरातील मनपाच्या पाण्याच्या टाक्या बनल्या तळीरामांचा अड्डा

प्रतिनिधी १ एप्रिल





**अकोला :** शहरातील महापालिकेच्या पाण्याच्या टाक्या मधून शहराला पाणीपुरवठा केला जातो. परंतु शहरातील अनेक पाण्याच्या टाक्यांवर सुरक्षा रक्षक नसल्याने पाण्याच्या टाक्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तर दुसरीकडे शहरातील काही पाण्याच्या टाकी परिसरात नेहमीच दारुड्यांची गर्दी पहावयास मिळते. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाणी टाकी परिसरात महाबळेश्वर चा आनंद घेण्यासाठी अनेक दारुडे दारू ढोसण्यासाठी या टाकी परिसरांना प्राधान्य देत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळेस तर शहरातील पाण्याच्या टाक्यांना जी सुरक्षा भिंत आहे. त्या भिंतीवर दारुडे चखना व दारूचे ग्लास ठेवून राजेशाही थाटात दारू पीत उभे असल्याचे दिसतात. विशेषता जुने शहरातील हरिहर पेठ, महाकाली नगर, शिवनगर, गंगानगर, स्टेशन चौक, तसेच नेहरू पार्क चौकातील पाणी टाकी परिसरात हे दृश्य रोजचे दिसून येत आहे. शहरातील पाणी टाकी परिसर सध्या बेकार तरुण व तळीरामांचा अड्डा बनला आहे. भांडणे, आरडा-ओरडा, वादविवाद, दारूच्या बाटल्यांच्या काचा आणि घाणीचे साम्राज्य यामुळे येथील रहिवासी विशेषता महिलांना भीतीच्या छायेत वावरावे लागत आहे. हे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालल्याने परिसरातील महिला अक्षरशः त्रस्त झाल्या आहेत. मागे काही दिवसांपूर्वी जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार सार्वजनिक ठिकाणी दारू पिणाऱ्या अनेक दारुड्यांवर कारवाई करण्यात आली आहे पण पाणी टाकी परिसरात दारू पिणाऱ्या एकाही दारुड्यावर अद्याप कारवाई न झाल्याने या दारुड्यांमध्ये पोलिसांची भीती कमी झाली आहे हे पाहता पाणी टाकी परिसरात दारू पिणाऱ्या दारुड्यांवर पोलिसांनी कारवाई करून परिसरातील महिलांना या दारुड्यांच्या भीतीपासून मुक्त करावे अशी मागणी होत आहे

# शहरात दूषित पाणीपुरवठ्यामुळे गोकर्णा पार्कचे नागरिक हैराण

प्रतिनिधी १ एप्रिल

**अकोला :** शहरातील डाबकी रोडवरील गोकर्णा पार्क परिसरात सध्या रहिवाशांना गंभीर समस्येला सामोरे जावे लागत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या परिसरातील नळांना मटमैले आणि दूषित पाणी येत आहे. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.


स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांना आठवड्यातून केवळ एक दिवस नळाद्वारे पाणीपुरवठा केला जातो. दुर्दैवाने, जे पाणी मिळते ते अत्यंत घाणेरडे आणि दूषित आहे. या दूषित पाण्यामुळे लोकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. दूषित पाण्यामुळे विशेषतः मुले आणि वृद्धांमध्ये घशात खवखव, जळजळ आणि इतर शारीरिक तक्रारी वाढल्या आहेत.

गढूळ पाणी प्यायल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, परिसरात साथीचे आजार पसरण्याची भीती व्यक्त होत आहे. गोकर्णा पार्क परिसरातील नागरिकांनी महानगरपालिकेच्या जलप्रदाय विभागाकडे ही समस्या तातडीने सोडवण्याची मागणी केली आहे. जर वेळेत योग्य पावले उचलली नाहीत, तर परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते, असा इशाराही त्यांनी दिला आहे. विशेषतः परिसरातील महिलांनी प्रशासनाकडे शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून नागरिकांना या त्रासातून दिलासा मिळेल.

# अकोला जिल्ह्यात 44 गावात 653.3 हेक्टर क्षेत्रात पिकांचे नुकसान

प्रतिनिधी १ एप्रिल

♦ अकोला आणि मूर्तिजापूर तालुक्यातील पिकांचे नुकसान ग्राह्य धरले



**अकोला :** सोमवारी रात्री वादळी वारे आणि गारपिटीने थैमान घातले. शासकीय निकषानुसार पिकांचे नुकसान फक्त अकोला आणि मूर्तिजापूर तालुक्यात दाखवले आहे. अकोला तालुक्यात ३६ गावात ६३४ हेक्टर क्षेत्रात ज्वारी, कांदा, गहू, लिंबू तर मूर्तिजापूर तालुक्यात ८ गावात १८.३ हेक्टर क्षेत्रात कांदा, गहू, लिंबू, भाजीपाला पिकांचे नुकसान झालेले दाखवले आहे. कदाचित अन्य तालुक्यातील नुकसान शासकीय निकषात बसले नसावे.

सोमवारी रात्री अकोला जिल्ह्यात सरासरी ५.९ मिमी पाऊस झाला. यामध्ये अकोला आणि मूर्तिजापूर तालुक्यात ४४ गावात ६५३.३ हेक्टर क्षेत्रात पिकांचे नुकसान झाले. तर, तेल्हारा तालुक्यातील चितलवाडी गावातील सखाराम झिटे या शेतक-याच्या पाच मेंढ्या अकोट तालुक्यातील कुटासा शिवारात वीज पडून मरण पावल्या. अकोट, पातूर तालुक्यातील पिकांचे नुकसान झाल्याची ओरड झाली. परंतु शासकीय आकडेवारी मध्ये तसा उल्लेख नाही. शासकीय निकषानुसार त्या भागातील नुकसान बसत नसावे अशी शक्यता आहे.

# नोकरीचे आमिष दाखवत युवकाची ८० लाखांनी फसवणूक

♦ सायबर पोलिसांनी दोन आरोपींना केले पालघरहून ताब्यात

प्रतिनिधी १ एप्रिल

**अकोला :** सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांमध्ये आणखी एका मोठ्या आर्थिक फसवणुकीचा पर्दाफाश करत सायबर पोलिस स्टेशन अकोला यांनी तब्बल ८० लाख ५ हजार ८३० रुपयांची फसवणूक करणाऱ्या आरोपींना मुंबईतील पालघर येथून ताब्यात घेतले आहे. ही कारवाई सोमवारी रात्री उशिरा करण्यात आली. रुबिना फारूक शेख आणि अतिष दिलीप गुप्ता अशी आरोपींची नावे असून त्यांना पालघर येथून अटक करण्यात आली. फिर्यादी हिरासिंग स्वरूपसिंग ठाकूर यांनी १५ डिसेंबर २०२५ रोजी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांनी एका जाहिरातीवरून दिलेल्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला असता, त्यांना पार्टटाईम व फुलटाईम नोकरीचे आमिष दाखवण्यात आले. सुरुवातीला १ हजार रुपये नोंदणी शुल्क भरायला सांगण्यात आले. त्यानंतर आरोपींनी 'हायप्रोफाइल महिला व मुलींसोबत मैत्री करून वेळ घालवण्याचे काम' तसेच महिन्याला २० हजार रुपये मिळतील, असे सांगत विश्वास संपादन केला. पुढे मसाजसाठी लागणारे साहित्य व औषधे खरेदी करण्यास भाग पाडून तसेच गुंतवणुकीच्या नावाखाली मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले. या भूलथापांना बळी पडत तक्रारदाराने एकूण ८० लाख ५ हजार ८३० रुपये गुंतवले. मात्र, कोणतेही साहित्य न देता आरोपींनी पैसे परत देण्यास टाळाटाळ केली व अधिक पैशांची मागणी केली. तेव्हा फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सायबर पोलिसांनी आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल खुणा व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा माग काढला. त्यानुसार २७ मार्च २०२६ रोजी पोलिस पथक पालघर येथे रवाना झाले.






# जेईई, एमएचटी-सीईटी, नीट परीक्षेच्या तयारीसाठी समर्थ स्कॉलरशिप एंट्रन्स टेस्ट रविवारी

प्रतिनिधी १ एप्रिल

♦ दहावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

**अकोला :** विदर्भातील विद्यार्थ्यांची प्रथम पसंती असलेले नितीन बाठे सरांच्या श्री समर्थ करिअर इन्स्टिटयूट ने शेकडो विद्यार्थ्यांचे इंजिनियर तसेच डॉक्टर बनण्याचे स्वप्न साकार केले आहे. जेईई, एमएचटी-सीईटी, नीट परीक्षेच्या तयारीसाठी समर्थ स्कॉलरशिप एंट्रन्स टेस्ट रविवार, ५ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आली आहे.

Bathe Sir's SAMARTHA CAREER INSTITUTE

आतापर्यंत जेईई, नीट आणि एमएचटी सीईटी परीक्षांमध्ये क्लासच्या विद्यार्थ्यांनी उत्तम रिझल्ट दिले आहेत. देशातील सर्वोत्तम गव्हर्मेंट इंजीनियरिंग आणि मेडिकल महाविद्यालयात प्रवेश मिळविण्याकरिता पूर्व परीक्षा जेईई, नीट, एमएचटी-सीइटी द्यावी लागते आणि याकरिता श्री समर्थ करिअर इन्स्टिटयूट येथे प्रदीर्घ अनुभवी उच्चशिक्षित 'आयआयटीएन्स' शिक्षक वृंद फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी आणि मॅथ्स, 'वीआर टेक्नॉलॉजी' द्वारे आणि हायली डिजिटल अॅडव्हान्स क्लासरूमच्या माध्यमातून शिकविण्यात येत आहे. दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना जे इंजीनियरिंग आणि मेडिकलमध्ये करिअर बनवू इच्छिता अशा विद्यार्थ्यांकरिता जेईई, नीट, एमएचटी सीईटी पूर्व परीक्षेची तयारी साठी समर्थ स्कॉलरशिप एंट्रन्स टेस्ट रविवार, ५ एप्रिल रोजी सकाळी ११ ते दु.१ पर्यंत श्री समर्थ करिअर इन्स्टिटयूट, बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसे नगर, अकोला येथे आयोजित केली गेली आहे. सदर एंट्रन्स एक्झाम क्वॉलिफाय करणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणांच्या आधारावर १०० टक्केपर्यंत स्कॉलरशिपसुध्दा मिळणार आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी त्यांच्या पालकासह क्लासच्या पत्त्यावर प्रत्यक्ष भेट देऊन नाव नोंदणी करावी व अधिक माहितीकरिता ७९३६१७०३० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# तपे हनुमान मंदिरात 551 किलो लाडूची निर्मिती

प्रतिनिधी १ एप्रिल



**अकोला :** शहरात हनुमान जयंतीच्या पार्श्वभूमीवर मंदिरांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. विविध मंदिरांमध्ये तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून तपे हनुमान मंदिरात तब्बल ५५१ किलो लाडू तयार करण्यात येत आहे. या निमित्ताने भाविकांसाठी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हनुमान जयंती उत्सवानिमित्त अकोला शहरातील सर्वच मंदिरांमध्ये साफसफाई, सजावट आणि धार्मिक कार्यक्रमांची जोरदार तयारी सुरू आहे. विशेषतः तपे हनुमान मंदिरात आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणारा ५५१ किलो वजनाचा लाडू तयार केला जात आहे. हा लाडू तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर साहित्याचा वापर करण्यात येत असून अनुभवी कारागीरांकडून त्याची निर्मिती केली जात आहे. हनुमान जयंतीच्या दिवशी हा महालाडू भगवान हनुमानाला अर्पण करण्यात येणार असून त्यानंतर भाविकांना प्रसाद म्हणून वितरित केला जाणार आहे. दरम्यान, मंदिर परिसरात भाविकांची गर्दी लक्षात घेता प्रशासनाकडून आवश्यक त्या सुविधा आणि सुरक्षा व्यवस्था देखील करण्यात आली आहे. हनुमान जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यासाठी सर्व तयारी पूर्ण झाल्याचे दिसून येत आहे.






# वादळ वाऱ्याने घरावरील टिनपत्र्यासह छप्पर उडाले

प्रतिनिधी १ एप्रिल



**कुटासाः** परिसरात दोन दिवसापूर्वी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे कुटासा येथील सुनिल जाधव नामक ग्रामस्थ यांच्या राहत्या घरावरील छपरासह टिनपत्रे उडुन घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असुन नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी या ग्रामस्थ कडुन केली जात असुन अचानक झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे अनेकांची तारांबळ उडाली होती. या वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.जणावरासाठी भरलेला चारा ओला झाला तर बागायतदार शेतकऱ्यांच्या गहु कांदा आंबा निंबु या सह इतर पिकांचे नुकसान झाले.






हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK